रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १९६
www.ramprahar.com
◆ सोमवार, २ फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## ‘अजितदादा माझ्याशी सगळ्या गोष्टी शेअर करायचे’



**मुंबई** : मी सर्व गोष्टींचा साक्षीदार आहे. आताच्या स्थितीत आम्हाला राजकारण करायचे नाही; अन्यथा मी अनेक गोष्टी सांगू शकतो काय घडलं आहे, काय घडतंय. अजितदादा माझ्याशी सगळ्या गोष्टी शेअर करायचे. त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला त्याच्या आदल्या दिवशी जवळपास एक तास आम्ही गप्पा मारत बसलो होतो. ते जर पक्षाच्या विलीनीकरणाची चर्चा करत असते, तर अशा प्रकारची कल्पना त्यांनी भाजपला दिली नसती का, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. विलीनीकरण करायचे की नाही हा सर्वस्वी राष्ट्रवादीचा निर्णय आहे. आमची अपेक्षा फक्त एवढी आहे की, हा निर्णय घेत असताना त्यांनी आमच्याशी चर्चा करायला हवी. राष्ट्रवादी पक्ष आमच्याशी अशी चर्चा करतोच आणि यापुढे करेल, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केला.

### अंतरंग

पनवेल-कर्जत रेल्वे मार्गावर अपघातात महिलेचा मृत्यू/२

खालापुरात ‘उबाठा’ची अस्तित्वासाठी धडपड/५

सूर्यकुमारच्या टी-२०मध्ये जलद तीन हजार धावा/८

# विकासाभिमुख अर्थसंकल्प

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचा विकासाभिमुख अर्थसंकल्प रविवारी (दि. १) सादर केला. सलग नवव्यांदा अर्थसंकल्प सादर करणाऱ्या त्या देशाच्या पहिल्या अर्थमंत्री ठरल्या आहेत. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये विविध क्षेत्रांसाठी आणि घटकांकरिता तरतूद करण्यात आली आहे. विकसित भारताच्या दिशेने वाटचाल करणारा हा अर्थसंकल्प आहे.**

### काय स्वस्त?

**वैद्यकीय उपकरणे, भारतात तयार होणारी कपडे, कर्करोग व मधुमेहावरील औषधे, क्रीडा साहित्य, मोबाईल फोन, अपघात विमा, लिथियम आयन बॅटरी, दुचाकी, एलसीडी-एलईडी, सौर पॅनेल, ईव्ही वाहने-ईव्ही बॅटरी, फ्रोझन फूड, सीएनजी, बायोगॅस, परदेशी प्रवास व शिक्षण, चामड्याची निर्यात**

### काय महाग?

**दारू, खनिज, शूज, पीव्हीसी फ्लेक्स शीट, सिगारेट, भंगार**



### कृषी क्षेत्राला आधुनिकतेची जोड

अर्थसंकल्पात देशाच्या कृषी क्षेत्राला आधुनिकतेची जोड देत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यावर भर देण्यात आला आहे.

पीक वैविध्यता वाढावी, शेतीच्या उत्पादकतेत वाढ व्हावी, शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ व्हावी आणि कृषी आणि संलग्न क्षेत्रात रोजगार निर्मिती व्हावी या दृष्टीने किनारपट्टीवरील शेतकऱ्यांच्या अर्थकारणाला बळकटी देण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. त्यानुसार देशातील एक कोटी नारळ उत्पादक शेतकऱ्यांची उत्पादकता वाढवण्याचे केंद्र सरकार लक्ष्य आहे. २०३०पर्यंत जागतिक स्तरावर काजू आणि भारतीय नारळाला प्रीमियम ग्लोबल ब्रँड करण्याच्या दृष्टीने पाऊले उचलली जाणार आहेत. केंद्र आणि राज्य सरकारांच्या मदतीने भारतीय चंदन परिसंस्थेला गती दिली जाणार आहे.

### वर्तमानातील स्वप्नांना पूर्ण करणारा अर्थसंकल्प : पंतप्रधान

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेला अर्थसंकल्प २०४७च्या विकसित भारताच्या स्वप्नाच्या उड्डाणासाठी एक मजबूत पाया रचतो. आज भारत ज्या ‘सुधारणा एक्सप्रेस’वर प्रवास करत आहे, त्याला हा अर्थसंकल्प नवीन ऊर्जा आणि गती देईल. या अभूतपूर्व सुधारणांमुळे भारताच्या धाडसी आणि प्रतिभावान तरुणांना आकाश खुले होईल. हा अर्थसंकल्प वर्तमानातील स्वप्नांना पूर्ण करणारा आहे, अशा शब्दांत पंतप्रधान मोदी यांनी कौतुक केले. ते पुढे म्हणाले, पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी अर्थसंकल्पात अनेक मोठी पावले उचलण्यात आली आहेत, जी विकसित भारताच्या प्रवासाला आणखी गती देतील.

**हा अर्थसंकल्प युवाशक्तीवर आधारित असून गरीब, वंचित आणि दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी समर्पित आहे. आम्ही सत्ता हाती घेतल्यापासून देशाचा आर्थिक प्रवास स्थैर्य, वित्तीय शिस्त, शाश्वत विकास आणि मध्यम महागाई दराने अधोरेखित झाला आहे. जागतिक अनिश्चितता आणि अडथळ्यांच्या काळातही आम्ही घेतलेल्या निर्णयांचे हे फळ आहे. देशाने सुमारे सात टक्के विकास दर गाठला असून गरिबी निर्मूलन आणि लोकांच्या जीवनमानात सुधारणा करण्यात आल्या आहेत. विरोधकांनी राजकीय टीका करायची असेल, तर जरूर करावी, पण तुमच्याकडे तथ्य असतील, तर ती समोर ठेवा. मी ऐकायला आणि उत्तर द्यायला तयार आहे.**

**-निर्मला सीतारामन**, केंद्रीय अर्थमंत्री

### महिलांसाठी ‘शी-मार्ट्स’ योजना

अर्थसंकल्पात सरकारने महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला नवी दिशा देणारी ‘शी-मार्ट्स’ योजना सुरू करण्याची घोषणा केली आहे. महिलांना आत्मनिर्भर करणारी ही योजना स्वयं-मदत उद्योजक मार्ट्सवर आधारित आहे. याशिवाय लखपती दिदी योजनेचा विस्तार केला जाणार आहे.

### मत्स्य व्यवसायासाठी अमृत तलाव योजना

अर्थसंकल्पातून मत्स्य व्यवसायाला चालना दिली जाणार आहे. त्यासाठी ५०० जलाशये आणि अमृत तलावांचा समन्वयीत विकास केला जाणार आहे. मत्स्य व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी मत्स्य उत्पादनात वाढ करणे, बाजारपेठ विकसित करणे आणि व्यवसाय वृद्धीसाठी स्टार्टअप्स, महिला बचत गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांची मदत घेतली जाणार आहे, असेही अर्थमंत्र्यांनी सांगितले.

# विरोधकांच्या पायाखालची वाळू घसरली -लोकनेते रामशेठ ठाकूर

## भाजप महायुतीच्या वाढत्या लोकप्रियतेला घाबरून विरोधकांकडून अपप्रचार -माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या रणधुमाळीत भारतीय जनता पक्षाने जोरदार शक्तिप्रदर्शन करत प्रचाराचा धडाका लावला आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गव्हाण जिल्हा परिषद गटातील उमेदवार निकिता खारकर आणि पंचायत समिती गणाच्या उमेदवार जिज्ञासा कोळी यांचा गव्हाण, कोपर, न्हावे व परिसरात जोरदार प्रचार केला.



या प्रचारादरम्यान बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, भाजपने गेल्या काही वर्षांत केलेल्या भरीव विकासकामांमुळे या संपूर्ण परिसराचा कायापालट झाला आहे. आमची कामगिरी जनतेसमोर आरशासारखी स्पष्ट आहे. त्यामुळेच येणाऱ्या निवडणुकीत विरोधकांचा पराभव अटळ असल्याचे चित्र दिसत असून याच भीतीपोटी विरोधकांच्या पायाखालची वाळू घसरली आहे. विरोधक बेताल व खोटा प्रचार तसेच दिशाभूल करण्याचे उद्योग करत आहेत, मात्र जनता आता जागरूक असून सत्य ओळखते.

या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांनीही विरोधकांवर जोरदार टीका करीत सांगितले की, गव्हाण जिल्हा परिषद गट हा प्रतिष्ठेचा मतदारसंघ असल्याने भाजप व महायुतीच्या वाढत्या लोकप्रियतेला घाबरून विरोधकांकडून जाणीवपूर्वक अपप्रचार केला जात आहे, मात्र या अपप्रचाराला जनता येत्या निवडणुकीत मतांच्या जोरावर चोख उत्तर देईल.

या प्रचारात माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, रत्नप्रभा घरत, भाजप नेते चंद्रकांत भोईर, रविशेठ पाटील, हेमंत ठाकूर, सचिन घरत, जयवंत देशमुख, किरण देशमुख, विश्वनाथ कोळी, न्हावे सरपंच विजेंद्र पाटील, मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ, नगरसेविका दर्शना भोईर, प्रतिभा भोईर, अस्मिता घरत, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, योगिता भगत, मीनाक्षी पाटील, सागर ठाकूर, सी.एल. ठाकूर, वंदना पाटील, किशोर पाटील, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, वर्षा नाईक, जयश्री कोळी, विराज देशमुख, बाळू कोळी, सुनील कोळी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. प्रचारादरम्यान परिसरातील नागरिकांकडून उमेदवारांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून आले. त्यामुळे भाजप महायुतीच्या उमेदवारांच्या विजयाबाबत कार्यकर्त्यांमध्ये मोठा आत्मविश्वास पहावयास मिळत आहे.

## निवडक

### अभिनेता रोहित शेट्टीच्या घराबाहेर गोळीबार, चौघे ताब्यात

**मुंबई** : बॉलीवूड निर्माता रोहित शेट्टी याच्या घराबाहेर गोळीबार झाल्याने सिनेविश्वात खळबळ उडाली आहे. रोहितच्या जुहू येथील बंगल्याबाहेर अज्ञात व्यक्तीकडून चार राऊंड फायर करण्यात आले. याबाबतची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. या प्रकरणी पुण्यातून चार जणांना अटक करण्यात आली आहे. दरम्यान, लॉरेन्स बिश्नोई गँगने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारल्याचे वृत्त आहे.

### कार्लोस अल्काराझ ठरला ऑस्ट्रेलियन ओपनचा चॅम्पियन

**मेलबर्न** : ऑस्ट्रेलियातील मेलबर्न पार्क येथे टेनिसच्या इतिहासात एक नवे पर्व लिहिले गेले. कार्लोस अल्काराझने नोवाक जोकोविचचा पराभव करत २०२६च्या ऑस्ट्रेलियन ओपनच्या अंतिम सामन्यात विजय मिळवला. अल्काराझने आपल्या कारकिर्दीतील सातवे ग्रँडस्लॅम विजेतेपद पटकावले. तब्बल तीन तास आणि दोन मिनिटे चाललेल्या या अंतिम सामन्यात चार सेट खेळले गेले, पण अखेरीस अल्काराझने बाजी मारत जेतेपद नावे केले.

## तळोजातील दुकानात सिलिंडरचा स्फोट

### महिला आणि दोन मुले जखमी



**पनवेल : वार्ताहर**

तळोजा फेज १ येथील एका दुकानाला रविवारी (दि. १) सकाळी लागलेल्या आगीत तीन जण जखमी झाल्याची घटना घडली. या आगीमध्ये दुकानाचेही मोठे नुकसान झाले आहे.

तळोजा फेज १मधील अंबिका स्टील सर्व्हिस सेंटर या गृहवस्तू भांडाराच्या दुकानात सिलिंडरचा स्फोट होऊन आग लागली. यामध्ये दुकानात असणारी एक महिला व दोन मुले जखमी झाली असून त्यांना नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली आणि आग आटोक्यात आणली. सिलिंडरचा स्फोट नेमका कशामुळे झाला याचा शोध घेतला जात आहे.

### श्वानदंशाने लहानग्याचा मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतजवळील उमरोली ग्रामपंचायत हद्दीत भटक्या



कुत्र्याने केलेल्या हल्ल्यात एका लहान मुलाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यामुळे हळहळ व्यक्त होत आहे.

पिसाळलेल्या कुत्र्याने ३ जानेवारी रोजी अनेकांना चावा घेतला होता. यामध्ये गुरू श्रद्धा सोसायटी राहणाऱ्या ऋषिकेश देवेंद्र पवार (वय १०) यालाही श्वानदंश झाला होता. त्याला मुंबईतील कस्तुरबा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान ऋषिकेशचा शनिवारी (दि. ३१) मृत्यू झाला. दरम्यान, प्रशासनाने भटक्या कुत्र्यांचा लवकरात लवकर बंदोबस्त करावा; अन्यथा उपोषण करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

## भाजप महायुतीची बाईक रॅली

### आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांची प्रमुख उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषद आणि पनवेल पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजप महायुतीने प्रचारात जोरदार आघाडी घेतली असून लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी (दि. १) भव्य बाईक रॅली आयोजित करण्यात आली होती. या रॅलीत विभागातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत उत्स्फूर्त व उदंड प्रतिसाद दिला.

भाजप महायुतीकडून पळस्पे जिल्हा परिषद गटातून हर्षदा घरत, कोन पंचायत समिती गणातून योगिता लहाने आणि पळस्पे पंचायत समिती गणातून राजेंद्र पाटील हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. निवडणुकीच्या अनुषंगाने भाजप महायुती विकासकामांचा आढावा घेत जनतेसमोर आपली भूमिका प्रभावीपणे मांडत आहे. महायुतीने आतापर्यंत केलेल्या विविध विकासकामांमुळे याचा सकारात्मक परिणाम नागरिकांच्या जीवनमानावर झाला आहे.

केंद्रात व राज्यात भाजप महायुतीचे डबल इंजिन सरकार कार्यरत आहे. केंद्र, राज्य व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समन्वय राहिल्यास विकासकामांना अधिक गती मिळते आणि निधीच्या उपलब्धतेतही अडचणी येत नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करायचा असल्यास जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्येही भाजप महायुतीची सत्ता असणे अत्यंत गरजेचे आहे, असा सूर उमटत आहे.

निवडणूक प्रचार शिगेला पोहचत असताना रविवारी पळस्पे व कोन येथून भाजप महायुतीची बाईक रॅली निघाली. तालुक्यातील विविध भागातून निघालेल्या या रॅलीदरम्यान भाजप महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. रॅलीच्या माध्यमातून विकासाचा संदेश घराघरात पोहचविण्यात आला असून मतदारांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून महायुतीला पाठिंबा दर्शविला.



**मुरूड : येथील एकदरा गायमुख समुद्रकिनारी नवी मुंबईतील न्यू अंगलर मुंबई या संस्थेने सहावी मासेमारी स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत अनेकांनी सहभाग घेऊन प्रतिसाद दिला.** (छाया : सुधीर नाझरे)

## ‘उबाठा’च्या उरण विधानसभा संघटक प्रीती कडव भाजपमध्ये

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

गव्हाण जिल्हा परिषद तसेच वहाळ व गव्हाण पंचायत समितीच्या निवडणूक प्रचाराला वेग आला असून ७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर शनिवारी उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये साउथ इंडियन समाजाची बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत मान्यवरांनी महायुतीच्या उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन केले. दरम्यान, या वेळी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उरण विधानसभा संघटक प्रीती कडव यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यांचे स्वागत करण्यात आले.



या बैठकीस माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, भाजप नेते रविशेठ पाटील, निलेश खारकर यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते, दक्षिण भारतीय मंडळी उपस्थित होती.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर आपल्या भाषणात म्हणाले की, भारतीय जनता पक्ष सबका साथ, सबका विकास या तत्त्वावर काम करतो. त्यामुळे या परिसरात नव्याने स्थायिक झालेल्या सर्व नागरिकांचाही समतोल विकास महायुती साधेल. नागरिकांनी विकासाला मत द्यावे.

आमदार महेश बालदी यांनी उलवे नोड परिसरात भाजप महायुतीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू असल्याचे सांगितले. विधानसभा निवडणुकीत दिलेले रेल्वे फेऱ्या वाढवण्याचे आश्वासन आपण पूर्ण केल्याचे नमूद करत पुढील काळात येथून मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, ठाणे व पनवेल येथे थेट रेल्वेसेवा सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. अधिकाधिक विकासासाठी जिल्हा परिषद व पंचायत समितीत महायुतीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून देण्याचे आवाहन त्यांनी केले.

जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी, पनवेल महापालिका निवडणुकीत लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली भाजप महायुतीने विकासकामांच्या जोरावर मोठा विजय मिळवला आहे. असाच विजय जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीतही मिळवायचा आहे. त्यासाठी सर्वांनी सज्ज रहावे, असे नमूद केले.

# विकसित भारताकडे दमदार पाऊल : मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्त्वात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेला अर्थसंकल्प हा विकसित भारताकडे दमदार वाटचाल करणारा आहे. केंद्रीय करातून महाराष्ट्राला मिळणारा वाटा हा ९८,३०६ कोटी रुपये इतका असणार आहे. याशिवाय अर्थसंकल्पाचे प्राथमिक आकलन करता, १२,३५५ कोटी विविध प्रकल्पांसाठी आहेत. त्यामुळे सुमारे १ लाख कोटी महाराष्ट्राला मिळतील, असे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले.



केंद्रीय अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना माध्यमांशी ते बोलत होते. शहरीकरणाला नियोजनबद्ध करुन, उद्योग आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देऊन, गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीसाठी खंबीर उपाययोजना या अर्थसंकल्पातून करण्यात आल्या आहेत. पायाभूत सुविधा क्षेत्रात १२ लाख कोटींची गुंतवणूक सरकार करणार आहे, पूर्वी जी केवळ १ लाख कोटी असायची. ५ लाख लोकसंख्या असलेल्या शहरातील विकासाचा विचार करुन शहरीकरणाच्या एकात्मिक विचार करण्यात आला आहे. यातून विविध क्षेत्रांना दिशा, गती आणि निधी प्राप्त होणार आहे. याचा मोठा लाभ महाराष्ट्राला होणार आहे. शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय आणि सिंचन यासाठी भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत.

लखपती दिदी योजनेच्या यशानंतर महिलांसाठी स्वतंत्र मॉल्स आणि उद्योगांच्या संधी तयार करण्याची योजना अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येक जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणार्या मुलींसाठी वसतीगृहांची योजना तयार करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात आपात चिकित्सा व्यवस्था उभी करण्याचा निर्णय आरोग्य क्षेत्रात मोलाचा ठरेल. मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद हायस्पीड कॉरिडॉरमुळे जीडीपीत मोठी वाढ होईल. पुणे-हैदराबाद कॉरिडॉरचा मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्राला मोठा लाभ होईल. ग्रोथहबसाठी ५००० कोटी प्रत्येकी ५ वर्षांत प्राप्त होणार आहेत, याचा लाभ मुंबई महानगर (एमएमआर), पुणे महानगर, नागपूर महानगर ग्रोथहबला होणार आहे, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

**महाराष्ट्रासाठी काय?**

*महाराष्ट्र ग्रामीण रस्ते प्रकल्प : ३७८.३८ कोटी - महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस प्रकल्प : १६७.२८ कोटी - सर्वसमावेशक विकासासाठी इकॉनॉमिक क्लस्टर : २८३.७७ कोटी - महाराष्ट्र टर्शरी केअर आणि वैद्यकीय शिक्षण विकास कार्यक्रम : ३८५.७८ कोटी - उपसा सिंचन योजनांचे सौर ऊर्जीकरण : २०७.१० कोटी - शेती आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्प : ६४६.२४ कोटी - मानवी विकासासाठी कौशल्य आणि अप्लाईड नॉलेज प्रकल्प : ३१३.६५ कोटी - जिल्ह्यांमध्ये संस्थात्मक संरचना क्षमतावृद्धीसाठी : २४०.९० कोटी - मुंबई-अहमदाबाद हायस्पीड कॉरिडॉर : ६१०३ कोटी - मुंबई मेट्रो : १७०२ कोटी - एमयुटीपी ३ : ४६२ कोटी - एमएमआरमध्ये ग्रीन मोबिलिटी : १५५.३२ कोटी - समृद्धी महामार्गावर आयटीएस : ६८०.७९ कोटी - पुणे मेट्रो : ५१७.७४ कोटी (ही केवळ मुंबई, पुण्यातील प्राथमिक आकडेवारी आहे. एकूण : १२,३५५ कोटी).*

# एकच काम दोन वेगवेगळ्या हेडखाली काढणाऱ्यांचे पार्सल त्यांच्या गावी पाठवा -आमदार दरेकर

## पैठण येथील सभेत मनसे पदाधिकाऱ्यांसह ग्रामस्थांचा भाजपमध्ये प्रवेश



**पोलादपूर : प्रतिनिधी**

कोटयवधींचा विकासनिधी आपण मुख्यमंत्री फडणवीस यांच्यामाध्यमातून मंजूर करून पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण भागात पाठविला. विधीमंडळ अधिवेशनातही तालुक्याचे प्रश्न सातत्याने उपस्थित केले. जिल्हा परिषदेमध्ये लोहारे गटातील मतदारांनी ज्यांना निवडून दिले त्यांनी एकच काम दोन वेगवेगळया हेड७खाली केली आणि डबल बिले काढली अन् विकासकामे न करताही बिले काढली. आता ते पार्सल त्यांच्या गावी पाठवा, असा घणाघात कॅबिनेट दर्जाचे आ.प्रवीण दरेकर यांनी शिवसेनेचे जिल्हा परिषदेचे लोहारेतील उमेदवार चंद्रकांत कळंबे यांच्या नामोल्लेखासह केला.

पैठण आणि लोहारे येथे शनिवारी सायंकाळी आ.दरेकर यांच्या लोहारे गटाचे भाजपचे उमेदवार कृष्णा कदम, कोतवाल बुद्रुक गणाचे उमेदवार सुरेंद्र चव्हाण तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या लोहारे गणाच्या उमेदवार युगज्ञा उतेकर यांच्या प्रचारार्थ जाहिर सभांचे आयोजन करण्यात आले असता आ.दरेकर बोलत होते.

याप्रसंगी पुढे बोलताना आ.दरेकर यांनी, तीन वेळा निवडून येऊन जिल्हा परिषदेच्या तिजोरीची नरवीर तानाजी मालुसरे पुण्यतिथी सोहळयानिमित्त दरवर्षी लुट करणाऱ्यांनी उमरठच्या प्राथमिक शाळेची इमारतही सुस्थितीत ठेवली नसल्याने विद्यार्थ्यांना मंदिरात शिक्षण घ्यावे लागत असल्याची टीका करून चंद्रकांत कळंबे यांच्याशी संबधितांचे काळेधंदे नावानिशी उघड केल्यानंतर उपस्थितांनी जल्लोष केला.

पैठण येथे व्यासपिठावर मुंबईचे नगरसेवक प्रकाश दरेकर, भाजपचे नेते ॲड. आस्वाद पाटील, रिपाइंचे सुदास मोरे, नागेंद्र राठोड, भाजप तालुकाध्यक्ष वैभव चांदे, महिला जिल्हा उपाध्यक्ष तनुजा भागवत, माजी सभापती दिलीप भागवत, माजी राजिप सदस्य मुरलीधर दरेकर व अनिल नलावडे, प्रसन्ना पालांडे, संतोष मोरे, विनोदराव मोरे तसेच उबाठा, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रवेशकर्ते मनसे तालुकाध्यक्ष दर्पण दरेकर यांनी आ.प्रवीणभाऊ यांच्यावर विश्वास ठेऊन प्रवेश करीत असल्याने पुढील वाटचालीसाठी भाऊंचे आशीर्वाद महत्वाचे असल्याचे सांगितले. रिपाइंचे सुदास मोरे यांनी तथागत गौतम बुध्द आणि लक्ष्मीदेवीच्या हाती असलेल्या कमळासमोरील बटन दाबून दोन्ही उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले.

मुंबई मनपाचे नगरसेवक प्रकाश दरेकर यांनी, कृष्णा कदम एलएलबी शिकले आहेत, त्यांच्यासारख्या उच्चशिक्षित आणि वैद्यकीय सेवा देणाऱ्या उमेदवाराला मते द्या असे आवाहन केले.


यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व भाजपनेते ॲड.आस्वाद पाटील यांनी, तालुकाध्यक्ष वैभव चांदे व अन्य कार्यकर्त्यांची सुचविलेली नांवे बाजूला ठेऊन कृष्णा कदम आणि सुरेंद्र चव्हाण यांची उमेदवारी निश्चित केली आहे, यांची उमेदवारांनी जाणीव ठेवावी, असे सांगून जनतेने दोन्ही उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी पैठण ग्रामस्थांनी भाजपामध्ये प्रवेश केल्याचे जाहिर केले. तुटवलीचे उद्योजक विनोदराव मोरे तसेच मनसेचे पदाधिकाऱ्यांनीदेखील यावेळी भाजपमध्ये जाहिर प्रवेश केला.

# मासळीची आवक घटल्याने भाव वधारले; सामान्य नागरिकांना मच्छीचा स्वाद दुरावला

**मुरुड : प्रतिनिधी**

माघ पौर्णिमेस जेजुरीच्या खंडोबाची यात्रा असल्याने मुरुड तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील समुद्र किनाऱ्यावर असणाऱ्या गावांना मासळीचा मोठा फटका सहन करावा लागत आहे .



रायगड जिल्ह्यातील मुरुड ,अलिबाग ,श्रीवर्धन ,उरण ,म्हसळा आदी सह अनेक तालुक्यांना मासळी तुटवड्यामुळे उपलब्ध मासळी किमतीत मोठ्या पटीने वाढ झाल्याने सर्वसामान्य नागरिकांना मासळी घेणे परवडत नाही.

कोकणातील ७२० किलोमीटर सागरी किनारा असून बहुसांख्य लोक समुद्रातून मासेमारी करून आपला उदरनिर्वाह करीत आहेत.समुद्र किनारी राहणारे कोळी बांधव हे धार्मिक व श्रद्धाळू सुद्धा आहेत .एक वर्ष बाजूला सारून संपूर्ण रायगड जिल्ह्यातील कोळी समाज बांधव माग पौर्णिमेस जेजुरीच्या खंडोबाची यात्रा असल्याने मोठ्या संख्येने जेजुरी गडावर जाऊन आपल्या कुलदैवताला भेटावयास जाण्याची परंपरा आहे .

सर्व भाविक कोण पायी दिंडी काढून तर मोठं मोठ्या ट्रॅव्हल्स बस बुक करून जेजुरी येथे खंडोबाच्या दर्शन मोठी गर्दी करीत आहेत .किमान एक आठवडा हा देवदर्शनाचा कार्यक्रम सुरु असल्याने अगोदरच सर्व तयारी करून जेजुरी गाठण्याचा उपक्रम ठरत असतो .

खंडोबाच्या दर्शनाला सर्व कोळी बांधव गेल्यामुळे सर्व बोटी किनाऱ्याला साकारलेल्या दिसून येत आहेत .बोटी खोल समुद्रत न गेल्याने मुरुड सह अनेक ठिकाणी मासळीची आवक घतल्याने मासळीचे भाव कमालीचे वधारले आहेत .

उपलब्ध मासळी फारच थोड्या प्रमाणात मिळत असल्याने भाव मोठ्या प्रमाणात वाढल्याने सर्वसामान्य नागरिक मासळी पासून दूर झाले आहेत .

सध्या बाजारात एक सुरमई नग १६०० रुपये तर पापलेट मिडीयम साईज एक जोडी ७०० रुपये भाव आकारला जात आहे .सर्व मासळी मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने पर्यटक व सामान्य ग्राहक याना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे .

हा आठवा संपल्यावर समस्त कोळीबांधव आपल्या घरी परतल्यावर बोटी खोल समुद्रात जाणार आहेत. तोपर्यंत मासळीची आवक कमी राहणार असून मासळीचे दर जास्तच राहणार आहेत . खोल समुद्रात जाऊन आठ ते दहा दिवस राहून सुधा मुबलक मासळी मिळत राहिल्यास मासळीचे भाव कमी होण्यास मदत होणार आहे .

### महापौर, उपमहापौरपद निवडणुकीसाठी नवी मुंबईत अर्ज दाखल

**नवी मुंबई : बातमीदार**

५ फेब्रुवारी २०२६ रोजी, सकाळी ११ वा. होणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिका महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणूकीसाठी रविवार रोजी १ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत महापालिका सचिव संघरत्ना खिल्लारे यांचेकडे नामनिर्देशनपत्रे दाखल करण्यात आलेली आहेत.

महापौरपदासाठी होणा-या निवडणुकीकरिता सरोज रोहिदास पाटील आणि सुजाता सुरज पाटील यांनी नामनिर्देशपत्र दाखल केले आहे.तसेच उपमहापौरपदासाठी होणा-या निवडणुकीकरिता आकाश बाळकृष्ण मढवी आणि दशरथ सिताराम भगत यांनी नामनिर्देशपत्र दाखल केले आहे. महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणूकीसाठी दि. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी विशेष सभा होणार आहे.



**खोपोली : येथील नगर परिषद कार्यालयाकडे जाणाऱ्या गुडलक कॉर्नर या ठिकाणी विद्युत कनेक्शनबाबत पाहणी करताना नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे; सोबत नगरसेवक**



**पनवेल : लाईफ केअर असोसिएशन नवीन पनवेल यांच्यातर्फे तालुक्यातील भल्याचीवाडी येरमाळ आणि गारमाळ येथे आदिवासी मुलांना कपडे, बिस्किट वाटप करण्यात आले. या वेळी सुरेश बाबू, जनार्दन नाहले, विनोद पाचघरे, कानवार साहेब, ठावकर साहेब, ऐकता कडु, मारुती शेटे, रमेश पोहाड, मोहिते मॅडम, सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील, किरण भगत, दशरथ वारा आदी उपस्थित होते.**

# हवामान बदलासाठी महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांचा पुढाकार



**मुंबई : प्रतिनिधी**

आपल्या उत्तम सादरीकरणाने गेल्या वर्षी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केल्यानंतर, मुंबई महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थी प्रतिष्ठित 'काळा घोडा कला महोत्सवा' त परत एकदा सादरीकरणास सज्ज झाले आहेत. या वर्षी, १० ते १२ वयोगटातील १०० हून अधिक विद्यार्थी 'द व्हिस्परिंग वूड्स ईशान्स जर्नी' नावाचे एक इंग्रजी संगीत नाटक सादर करणार आहेत.

आवड म्हणून निसर्गाचे निरीक्षण करणे ते त्याची सक्रियपणे जबाबदारी घेणे, असा या नाटकाचा प्रवास आहे. या अनोख्या उपक्रमाचा एक भाग म्हणून, विद्यार्थ्यांना नेपथ्य, नाट्यकला आणि अभिनय क्षेत्रातील व्यावसायिकांसोबत काम करण्याची संधी मिळाली, ज्यामुळे त्यांना प्रत्यक्ष अनुभवातून मौल्यवान शिक्षण मिळाले. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे परफॉर्मिंग आर्ट्सच्या जगाची ओळख झाली.

हे संगीत नाट्य म्हणजे 'पहले अक्षर फाउंडेशन' द्वारे चालवल्या जाणाऱ्या एका वर्षभराच्या नाट्य-आधारित शिक्षण कार्यक्रमाचे सार आहे. भाषा विकास आणि स्व-अभिव्यक्तीसाठी ते सादरीकरणाचा एक साधन म्हणून वापर करतात. विद्यार्थ्यांनी यासंदर्भात एक आखीव अभ्यासक्रम पूर्ण केला आहे, ज्यात संवाद कौशल्यासोबतच, आत्मविश्वासाने इंग्रजीमधील सादरीकरणाचा समावेश आहे.

## पनवेल-कर्जत रेल्वे मार्गावर अपघातात महिलेचा मृत्यू

**चौक :** कर्जत-पनवेल रेल्वे मार्गावर चौक रेल्वे स्टेशन जवळ धावत्या रेल्वेचा एका महिलेला धक्का लागल्याने तिचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. चौक रेल्वे स्टेशन जवळ रेल्वे पटरीवर मनीषा श्याम वाघ, वय ३० वर्ष, रा.नढाळ, तालुका खालापूर जिल्हा रायगड हिला छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते पुणे जंक्शन जाणारी प्रगती एक्सप्रेस या रेल्वे ची धडक लागल्याने तिचा जागीच मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच चौक दूर क्षेत्र प्रभारी विशाल पवार यांनी घटनास्थळी येउन या बाबत खालापूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## ग्राहकांची ऑनलाईन तक्रार प्रक्रिया ठप्प

**मुंबई : प्रतिनिधी**

कंज्युमर गाइडन्स सोसायटी ऑफ इंडिया या नामांकित स्वयंसेवी संस्थेची ग्राहकांसाठीची हेल्पलाईन सेवा सध्या खंडित झाल्याने नागरिकांना ऑनलाईन तक्रार नोंदवता येत नाही. या तांत्रिक अडचणीमुळे ग्राहकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.

या संस्थे मार्फत मार्फत ग्राहकांच्या तक्रारी ऐकून घेणे, त्यावर मार्गदर्शन करणे तसेच योग्य ती कायदेशीर मदत उपलब्ध करून देण्याचे काम केले जाते. मात्र हेल्पलाईन व ऑनलाईन तक्रार प्रणाली बंद असल्याने अनेक ग्राहकांचे प्रश्न प्रलंबित राहिले आहेत. यासंदर्भात संस्थेचे कर्मचारी तुकाराम पवार यांनी सरकारकडे मागणी केली असून, ग्राहक हित लक्षात घेता ही हेल्पलाईन सेवा तातडीने सुरू करण्यात यावी असे त्यांनी सांगितले.

ग्राहक संरक्षणाच्या दृष्टीने ही सेवा अत्यंत महत्त्वाची असून, ती दीर्घकाळ बंद राहणे अन्यायकारक असल्याचे त्यांनी नमूद केले. सरकारने याची दखल घेऊन तांत्रिक अडचणी दूर करून संस्थेची हेल्पलाईन व ऑनलाईन तक्रार सेवा लवकरात लवकर कार्यान्वित करावी अशी मागणी होत आहे.

CONSUMER GUIDANCE SOCIETY OF INDIA
CGSI
ग्राहक सेवा सुरक्षा संतोष

# विळे येथील शिवसेनेच्या सभेत स्व. अजितदादांना श्रद्धांजली अर्पण

**माणगाव : बातमीदार**

आगामी जिल्हा परिषद रायगड व पंचायत समिती माणगाव निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निजामपूर जिल्हा परिषद गणाचे शिवसेनेचे अधिकृत उमेदवार अविनाश नलावडे तसेच पाटणूस पंचायत समिती गणाचे अधिकृत उमेदवार विलास शिंदे यांच्या प्रचारार्थ विळे येथे शिवसेनेची भव्य जाहीर सभा शिवसेनेचे उपनेते व मंत्री भरत गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडली.



सभेच्या प्रारंभी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना उपस्थित मान्यवर व नागरिकांच्या वतीने सामूहिक भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी उबाठा पक्षाच्या सणसवाडी येथील महिला शाखाप्रमुख मुक्ता बामूगडे यांनी अनेक महिला भगिनींसह मंत्री भरत गोगावले यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. तसेच पाटणूस येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे दीपक येरूणकर, कुणाल मोरे, वैभव महामुनकर, प्रथमेश महामुनकर व मारुती मालुसरे यांनीही शिवसेनेत जाहीर पक्षप्रवेश केला.

स्थानिक मतभेदांबाबत स्पष्ट भूमिका मांडत त्यांनी सांगितलेकी,पक्षामध्ये स्थानिक मतभेद होणं स्वाभाविक आहे, पण पक्षाशी गद्दारी करण्याचा प्रयत्न कोणी केला तर गाठ थेट माझ्याशी आहे, हे लक्षात ठेवा.यावेळी त्यांनी त्यांच्या 'नॅपकिनच्या जादू'वर भाष्य करत सांगितले की,माझ्या नॅपकिनची जादू म्हणजे त्यामध्ये जनतेचे प्रेम आणि जनसेवेचा विचार आहे. हाच विचार घेऊन आम्ही जनतेत फिरतो. शिवसेनेचे प्रमुख नेते व उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेबांच्या मार्गदर्शनाचा उल्लेख करत मंत्री गोगावले म्हणाले की,विरोधकांना टिकेतून नाही तर विकासकामांतून उत्तर द्यायचे आहे. यासोबतच ना.भरत गोगावले यांनी माणगाव येथील एमआयडीसीमध्ये प्रत्येक स्थानिक तरुणाला रोजगार मिळवून देण्याची ठाम हमी दिली.

# भाजप महायुतीच्या प्रचाराचा झंझावात

## नेरे जिल्हा परिषद मतदारसंघात प्रचार रॅली



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील नेरे जिल्हा परिषद मतदारसंघासाठी भाजप महायुतीकडून आदिवासी समाजाचे आत्माराम बाळू भस्मा यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यात आले आहे. तर आदई पंचायत समितीसाठी भाजप महायुतीकडून पुन्हा एकदा भूपेंद्र पाटील यांना संधी देण्यात आली असून, नेरे पंचायत समितीसाठी वर्षा केवारे या उमेदवार आहेत.

रविवारी भारतीय जनता पक्ष महायुतीच्या वतीने नेरे जिल्हा परिषद मतदारसंघात भव्य प्रचार रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत नेरे, सांगतोली, वाजे, चेरीवली, वाजापुर, मोठी व लहान धामणी, देहरंग, गाडे, बाबदेव वाडी, वाघाची वाडी, धोदाणी, मालडुंगे, टावरवाडी, सतीची वाडी, कुंभटेकडी, शिवनसई, दुंदरे, दुंदरेपाडा, रिटघर आणि चिंचवली या गावांमधून रॅली काढण्यात आली.

या रॅलीला भाजपचे ज्येष्ठ नेते संजय पाटील, पनवेल महानगरपालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक विकास घरत,नगरसेवक रवींद्र भगत यांच्यासह राज पाटील, राजा भोईर, प्रकाश घाडगे, श्याम भालेकर, राजा भालेकर, सिताराम चौधरी, रोशन पाटील, गुरुनाथ भोपी, प्रलय भोपी, एकनाथ भोपी, बाळकृष्ण गोपी, रोहन पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी भाजप तसेच महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

रॅलीदरम्यान मतदारांशी थेट संवाद साधत महायुतीच्या उमेदवारांनी विकासकामांचा आढावा मांडला. नेरे परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी महायुती कटिबद्ध आहे, असा विश्वास या वेळी उपस्थित नेत्यांनी व्यक्त केला. प्रचाराच्या अंतिम टप्प्यात महायुतीची ताकद दाखवणारी ही रॅली ठरली.

## वडघर आणि करंजाडेत बाईक रॅली





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप महायुतीच्या वडघर जिल्हा परिषद गट व करंजाडे पंचायत समिती गणाच्या प्रचारासाठी रविवारी भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या बाईक रॅलीला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, भाजपचे ज्येष्ठ नेते व राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत तसेच युवा नेते व पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी रॅलीमध्ये सहभाग घेतला. वडघर जिल्हा परिषद गटातून भाजप महायुतीच्या वतीने सोनाली जितेकर, तर करंजाडे पंचायत समिती गणातून रंजना वास्कर या उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

या बाईक रॅलीची सुरुवात करंजाडे शहरातील सेक्टर-५ येथील भाजप महायुतीच्या प्रचार कार्यालयातून झाली. रॅली सेक्टर ५-अ, सेक्टर ६, सेक्टर ४, सेक्टर ३, सेक्टर १, सेक्टर २, सेक्टर २-अ, कॉलेज फाटा आणि आर-४ परिसरातून मार्गक्रमण करत जोरदार प्रचार करण्यात आला.

या रॅलीला तरुणांसह ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या प्रचार रॅलीत करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार, भाजपचे ज्येष्ठ नेते करणा शेलार, माजी सरपंच रामेश्वर आंग्रे, पश्चिम मंडळाचे भाजप अध्यक्ष रूपेश धुमाळ, सदाशिव वासकर यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य व भाजप महायुतीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक : तारा येथे महायुती उमेदवारांचा ग्रामस्थांशी संवाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले असून, भारतीय जनता पक्ष आणि महायुतीच्या उमेदवारांनी आपला प्रचार वेगाने सुरू केला आहे. केळवणे जिल्हा परिषद गटाचे अधिकृत उमेदवार मंगेश वाकडीकर आणि केळवणे पंचायत समिती गणाच्या उमेदवार शीतल माळी यांच्या प्रचारार्थ शुक्रवारी कर्नाळा ग्रामपंचायतीमधील तारा गावात जोरदार शक्तिप्रदर्शन करण्यात आले.





या प्रचारादरम्यान भाजपच्या बूथ प्रचार कार्यालयाचे उद्घाटन माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. या वेळी उपस्थितांना संबोधित करताना उमेदवार मंगेश वाडकीकर यांनी सांगितले की, भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून आपल्या परिसराचा विकास अत्यंत वेगाने झाला आहे. हा विकासकामांचा रथ असाच अविरतपणे सुरू राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच, येत्या तारखेला कमळ या निशानीसमोरील बटण दाबून महायुतीला भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन त्यांनी ग्रामस्थांना केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या वेळी साई ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अण्णा पाटील, तालुका सरचिटणीस संतोष पाटील, बाळूशेठ पाटील, केळवणे जिल्हा परिषद अध्यक्ष विद्याधर जोशी यांच्यासह भाजपचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी माजी सरपंच आण्णाशेठ पाटील यांनी सांगितले की, आपले उमेदवार मंगेश वाकडीकर व शितल माळी हे कामाच्या बाबतीत पूर्ण तत्पर आहेत. आपण यांना भरघोस मतांनी मंगेश वाकडीकर साहेब आणि शितल अनंता माळी यांना निवडून द्यायचा आहे. दोघांची पण आपली कमळच आहे. कमळाची निशाणी लक्षात ठेवून भरपूर मताने निवड द्या, असे आवाहन केले.

या वेळी पंचायत समितीचे माजी उपसभापती जिवन म्हात्रे, केळवणे पंचायत समिती अध्यक्ष सुशिल ठाकूर, गणेशजी पाटील, कर्नाळा मा. सरपंच राजू पाटील, सरपंच रजनी ठाकूर, माजी केळवणे पंचायत समितीचे अध्यक्ष हिरामण ठाकूर, प्रफुल पाटील, केळवणे गाव अध्यक्ष रामचंद्र मोकल, माजी उपसरपंच भानुदास गावंड, शेखर कानाडे, ग्रामपंचायत सदस्या उज्वला ठाकूर, रत्नाकर घरत आदी उपस्थित होते.

## निवडक

### दुकानातून सुक्या मेवाची चोरी

**पनवेल :** चोराने दुकानात प्रवेश करून काजू, बदाम, वेलची, रोख रक्कम असा १६ हजार २०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी कळंबोली पोलीस अधिक तपास करत आहेत. सुशील जयस्वाल हे उलवे येथे राहत असून त्यांचा कळंबोली, सेक्टर ११ येथे गोयल ट्रेंडिंग शॉप आहे. ते दुकानावर आले असता लोखंडी कुलूप कापलेले दिसून आले. आत मध्ये जाऊन पाहणी केली असता काजू, बदाम, वेलची आणि रोख रक्कम दिसून आली नाहीत.

### ट्रकमधील डिझेलची चोरी

**पनवेल :** ट्रकमधील दीडशे लिटरची डिझेलची चोरी केल्याप्रकरणी तीन अनोळखी व्यक्तीविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मोहम्मद अली यांनी मुंबई पुणे एक्सप्रेस हायवेवरील भाताण, एमेटी युनिव्हर्सिटी येथील ट्रक पार्किंगमध्ये कंटेनर ट्रक पार्क करून ते विश्रांती करत होते. पहाटे सहाच्या सुमारास तीन अनोळखी व्यक्ती ट्रकमधील डिझेल चोरी करून पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट डिझायर कारमध्ये ठेवत असताना दिसून आले. त्यांना हटकले असता या वेळी ते तिघे कारमधून पळून गेले.

### खारघरमध्ये पादचाऱ्याचा मृत्यू

**पनवेल :** अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत रस्ता क्रॉस करणाऱ्या पादचाऱ्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. एक पन्नास वर्षीय अनोळखी व्यक्ती खारघर येथील मुंबई पुणे लेनवर हिरानंदानी ब्रिजच्या पुढे रस्ता क्रॉस करत होता. या वेळी अज्ञात वाहन चालकाने चार चाकी वाहन भरधाव वेगाने चालवून त्याला धडक दिली. या धडकेत त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर कारचालक पळून गेला.

### लोखंडी वॉल ब्रॅकेटची चोरी

**पनवेल :** लोखंडी वॉल ब्रॅकेटची चोरी केल्याप्रकरणी अज्ञाता विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. बीजी शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी यांचे सिडको प्रोजेक्ट नावडे येथून लोखंडी वॉल ब्रॅकेट अज्ञाताने चोरी करून नेले. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## देशी दारूचा साठा हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल जवळील पळस्पे गाव येथे पनवेल शहर पोलीस ठाणे व सहाय्यक पोलीस आयुक्त युनिट ३ च्या पथकाने केलेल्या संयुक्त कारवाईमध्ये मोठ्या प्रमाणात देशी दारुचा साठा हस्तगत केला असून याप्रकरणी एका महिलेविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

पळस्पे गाव परिसरात एक महिला बेकायदेशीररित्या देशी दारुचा साठा करून त्याची विक्री करत असल्याची माहिती पनवेल शहर पोलीस व सहाय्यक पोलीस आयुक्त युनिट ३ ला मिळताच त्यांच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून जवळपास ४ हजार ८०० रुपयाचा देशी दारुचा साठा हस्तगत केला आहे.

ही कारवाई सहाय्यक पोलीस आयुक्त ढोले, वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विनोद लभडे, पोलीस हवा.मंजूळे, परेश म्हात्रे, पवार, पो.ना.देशमुख, वसावे, म.पो.शि. टाकळे आदींच्या पथकाने केली.

## गव्हाण विद्यालयाचे मतदान जनजागृती अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती २०२६ची सार्वत्रिक निवडणुक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी होत आहेत. या पार्श्वभूमीवर मतदान जनजागृती व्हावी या उद्देशाने रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी मंगळवारी मतदान जनजागृती सायंकाळी फेरी काढली.

या मतदान जनजागृती फेरीमध्ये विद्यालयाच्या पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे यांचेसह चारुशीला ठाकूर, हर्षला पाटील, सागर रंधवे व मोनाली बाबर आदी शिक्षक व विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले. इयत्ता सातवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती मोहीम हाती घेतली. या वेळी कोपर गावातून मतदानाची ही फेरी काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी या वेळी 'विकास की गंगा बहना है मतदान का फर्ज निभाना है ।



'वोट फॉर बेटर नेशन',' युवर वोट, युवर व्हॉईस',' सोडा सारे काम धाम मतदान करणे पहिले काम',' चला मतदान करूया देशाची प्रगती घडवूया' अशा घोषणांनी मुलांनी कोपरगाव परिसर दणाणून सोडला. घोषणा फलकही लक्षवेधी ठरले.

या मतदान जनजागृती फेरीमध्ये पालकांचाही सहभाग आणि प्रतिसाद लाभला. विद्यार्थी अगदी तन्मयतेने मतदानासंबंधी घोषणाबाजी करत होते. देशाच्या प्रगतीसाठी मतदानाचे महत्त्व गल्लोगल्ली फिरून सांगत होते. गव्हाण शाखेतील अनेक उपक्रमांपैकी हा एक अभिनव आणि राष्ट्रीय उपक्रम मानला जातोय.

## ठाकरे गटाचे राजेंद्र म्हात्रे भाजपत दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण जिल्हा परिषदेत राजकीय घडामोड समोर आली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते राजेंद्र म्हात्रे यांनी शनिवारी भारतीय जनता पक्षात जाहीर पक्षप्रवेश केला. यामुळे बामणडोंगरी गावासह उलवे नोड परिसरात महाविकास आघाडीला जोरदार फटका बसल्याची चर्चा आहे.

याचवेळी नेव्हीचे निवृत्त अधिकारी महेश सिंग यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला. राजेंद्र म्हात्रे यांच्यासोबत शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपचा झेंडा हाती घेतल्याने वहाळ विभागात भाजपची ताकद लक्षणीयरीत्या वाढली आहे. या भव्य पक्षप्रवेश सोहळ्याला भाजपचे ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, आमदार महेश बालदी, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, भाजप नेते रवीशेठ पाटील, विभागीय अध्यक्ष रुपेश धुमाळ, नाव्हा ग्रामपंचायतचे सरपंच विजेंद्र



पाटील, निलेश खारकर, युवा नेते धीरज ओवळेकर यांच्यासह अनेक प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

या वेळी जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी भाषणात सांगितले की, पनवेल आणि उरण विधानसभा मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू आहेत. या विकासावर विश्वास ठेवूनच दोन्ही मतदारसंघात भाजपमध्ये मोठ्या प्रमाणावर पक्षप्रवेश होत आहेत, असे त्यांनी नमूद केले.

उलवे नोड येथे होत असलेले हे पक्षप्रवेश लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर आणि ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या अनेक वर्षांपासून गव्हाण विभाग व उलवे परिसरात राबविण्यात येत असलेल्या समाजोपयोगी उपक्रमांचे फलित असल्याचेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्व नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचे भाजपत मनापासून स्वागत केले.

## गुळसुंदे ग्रामपंचायतीत संत शिरोमणी रोहिदास महाराज जयंती उत्साहात





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील गुळसुंदे ग्रामपंचायत कार्यालयात थोर समाजसुधारक, संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची जयंती रविवारी (दि.१) मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाची सुरुवात संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व अभिवादनाने करण्यात आली.

उपस्थितांनी संत रोहिदास महाराज यांच्या जीवनकार्यावर सखोल मार्गदर्शन केले. समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि मानवतावादी विचारांचा प्रसार करण्याचे कार्य संत रोहिदास महाराज यांनी आपल्या आयुष्यातून केले. समाजातील जातीभेद, विषमता व अन्याय दूर करून सर्वांना समानतेची व सन्मानाची वागणूक मिळावी, हा त्यांचा संदेश आजच्या काळात अधिकच महत्त्वाचा असल्याचे मत माजी सरपंच आर. डी. पाटील यांनी व्यक्त केले. त्यांच्या विचारांचा स्वीकार करून सामाजिक सलोखा जपण्याची जबाबदारी आजच्या पिढीवर असल्याचेही या वेळी नमूद करण्यात आले.

या कार्यक्रमास गुळसुंदे सरपंच मिनाक्षी जगताप, ग्रामपंचायत सदस्य सतिश साठे, सदस्या अपर्णा चौलकर, ताई गायकवाड, चिंतामण कडवे, राजेश साठे, अंकुश साठे, विनायक पाटील, सुनील पालकर, अशोक गायकवाड, संतोष चौलकर, योगेश साठे, स्वप्निल चौलकर, सचिन गायकवाड, आतिष पाटील, संकेत चौलकर, समाधान गायकवाड, सुशीला गरुडे, अनिता गायकवाड, सखुबाई साठे, नंदा चौलकर, शोभा गायकवाड, ज्योती कडवे, स्वाती गायकवाड, ऋतुजा कडवे, नमिता कडवे आदी उपस्थित होते.

## उरण तालुका राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली

**उरण : बातमीदार**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांचे नुकतेच एका विमान दुर्घटनेत दुर्दैवी मृत्यू झाला. या मृत्यूमुळे संपूर्ण देशावर शोककळा पसरली होती. अजितदादा पवार हे निर्भीड स्पष्ट वक्ते,उत्तम प्रशासक, उत्तम राजकारणी होते. सर्वांच्या मनावर त्यांनी अधिराज्य गाजविले होते. त्यांनी आपल्या कार्यकाळात उत्तम असे प्रशासन चालवले होते त्यामुळे त्यांच्या निधनाने सर्वत्र शोक व्यक्त करण्यात आला.

उरण तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने उपमुख्यमंत्री अजितदा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून तसेच दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहण्यात आली. या वेळी उरण तालुकाध्यक्ष परीक्षित ठाकूर यांनी अजित दादा पवार यांच्या आठवणींना उजाळा दिला. असा नेता पुन्हा होणार नाही, सर्वांच्या सुखदुःखात असणारा चांगला नेता एक उत्तम मार्गदर्शक गमावल्याचे परीक्षित ठाकूर यांनी सांगितले.

उरण तालुक्यातील नागाव रोड येथील पक्ष कार्यालयात झालेल्या या श्रद्धांजली कार्यक्रम प्रसंगी केगाव पंचायत समिती साठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तर्फे निवडणूक लढवणारे उमेदवार परीक्षित ठाकूर, राज्य सरचिटणीस मनोज भगत, नवघर पंचायत



समितीचे उमेदवार ॲड. रजनीकांत पाटील, जिल्हा सरचिटणीस विद्याधर घरत, जिल्हा सरचिटणीस रमण कासकर, उरण विधानसभा अध्यक्ष वैजनाथ ठाकूर, जिल्हा चिटणीस रतन म्हात्रे, उरण विधानसभा चिटणीस निलेश पाटील, जिल्हा उपाध्यक्ष भूषण ठाकूर, जिल्हा वाहतूक सेल उपाध्यक्ष नरेश घरत, युवक तालुका अध्यक्ष अखिलेश भोईर, युवा सेल तालुका अध्यक्ष मच्छिंद्र ठाकूर, तालुका चिटणीस नामदेव मढवी आदी उपस्थित होते.

अजितदादा पवार यांच्या दुःखद निधनामुळे जिल्हा परिषद, पंचायत समिती आदी निवडणुका मध्ये साध्या पद्धतीने, पत्रके वाटून प्रचार करण्यात येणार असल्याचे तालुका अध्यक्ष परीक्षित ठाकूर यांनी सांगितले.


## संपादकीय

# दिशादर्शक बजेट

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प संसदेत सादर केला. देशाचा यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प दीर्घकालीन आर्थिक विकासाचा विचार करून सादर करण्यात आला आहे. या अर्थसंकल्पाचा केंद्रबिंदू स्पष्ट आहे तो म्हणजे युवाशक्ती, गरीब, वंचित आणि दुर्बल घटकांचा सर्वांगीण विकास आणि त्याचबरोबर २०४७पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचा दीर्घकालीन संकल्प...

**जागतिक आर्थिक अस्थिरता, महागाई कमी करणे आणि रोजगारनिर्मितीची गरज लक्षात घेता सरकारने सावध, पण स्पष्ट दिशा असलेला अर्थसंकल्प मांडला आहे. या अर्थसंकल्पाचा केंद्रबिंदू वाढ, गुंतवणूक आणि उत्पादन हाच आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अर्थसंकल्पाचे वर्णन विकसित भारताच्या स्वप्नाच्या उड्डाणासाठीचा मजबूत पाया असे केले आहे. हे विधान केवळ राजकीय स्तुतीपुरते न राहता अर्थसंकल्पातील व्यापक दृष्टिकोन, दीर्घकालीन विचार आणि सर्वसमावेशक विकासाच्या भूमिकेवर प्रकाश टाकते. २०२६-२७चा अर्थसंकल्प हा केवळ वार्षिक उत्पन्न-खर्चाचा ताळेबंद नाही, तर तो भारताच्या पुढील दोन दशकांच्या विकासमार्गाचा दिशादर्शक दस्तऐवज आहे. जागतिक आर्थिक अस्थिरता, भू-राजकीय तणाव, हवामान बदलाचे परिणाम आणि तंत्रज्ञानातील वेगवान बदल या सर्व पार्श्वभूमीवर हा अर्थसंकल्प मांडण्यात आला आहे. अशा परिस्थितीत आर्थिक शिस्त राखत विकासाला गती देणे हे सरकारपुढील मोठे आव्हान होते. या बजेटमध्ये राजकोषीय शिस्त आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न दिसून येतो. एकीकडे विकासाभिमुख खर्चावर भर देण्यात आला आहे, तर दुसरीकडे अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत ठेवण्यासाठी दीर्घकालीन सुधारणांचा मार्ग स्वीकारण्यात आला आहे. भारत हा तरुणांचा देश आहे. लोकसंख्येचा मोठा हिस्सा तरुण वयोगटातील असल्याने युवाशक्तीचा योग्य वापर झाला, तर भारत जागतिक पातळीवर आघाडी घेऊ शकतो. २०२६-२७च्या अर्थसंकल्पात ही बाब केंद्रस्थानी ठेवण्यात आली आहे. सरकारने शिक्षण, कौशल्य विकास, नवउद्योजकता आणि रोजगारनिर्मिती या क्षेत्रांवर विशेष लक्ष केंद्रित केलेले दिसते. केवळ पदवी देणारी शिक्षणव्यवस्था न ठेवता रोजगारक्षम कौशल्ये निर्माण करण्यावर भर देण्याची दिशा स्पष्टपणे दिसून येते. स्टार्टअप संस्कृतीला चालना, नवोन्मेषाला प्रोत्साहन आणि तंत्रज्ञानाधारित उद्योगांना पाठबळ देण्याच्या धोरणातून युवाशक्तीला संधी देण्याचा सरकारचा प्रयत्न अधोरेखित होतो. समावेशक विकास हा या अर्थसंकल्पाचा गाभा आहे. आर्थिक प्रगतीचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचला पाहिजे या विचारातून गरीब, वंचित, महिला, शेतकरी, कामगार आणि दुर्बल घटकांसाठी कल्याणकारी धोरणांना प्राधान्य देण्यात आले आहे. ग्रामीण विकास, मूलभूत सुविधा, आरोग्यसेवा आणि सामाजिक सुरक्षेवर भर देणे हे या दृष्टिकोनाचे प्रतीक आहे. सरकारची भूमिका केवळ मदत देण्यापुरती न ठेवता, स्वावलंबन निर्माण करण्याकडे झुकलेली दिसते. 'कल्याण' आणि 'सक्षमीकरण' यांचा संगम साधण्याचा प्रयत्न या बजेटमध्ये जाणवतो. देशाच्या आर्थिक प्रगतीत महाराष्ट्राचे योगदान ऐतिहासिक आणि निर्णायक राहिले आहे. औद्योगिक, वित्तीय आणि शैक्षणिक क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर आहे. २०२६-२७चा अर्थसंकल्प महाराष्ट्रासाठीही संधींचे नवे दरवाजे उघडतो. योग्य अंमलबजावणी आणि जनसहभागाच्या माध्यमातून हा अर्थसंकल्प भारताला नव्या उंचीवर घेऊन जाईल.**

# बिरवाडी, घोसाळेगड किल्ल्यांच्या कातळावर इतिहासाची छाप



कोकणातील दुर्गवैभव केवळ त्यांच्या अभेद्य तटबंदीसाठीच नाही, तर तेथील समृद्ध सामाजिक जीवनासाठीही ओळखले जाते. याचाच एक महत्त्वपूर्ण पुरावा सह्याद्रीतील भटकंती करणारे सुजल संतोष पडवळ आणि वन्यजीव अभ्यासक रोशन म्हात्रे यांच्या संशोधनातून समोर आला आहे. रोहा तालुक्यातील ऐतिहासिक बिरवाडी गड आणि घोसाळगड परिसरात तब्बल १२०हून अधिक प्राचीन मंकला खेळाचे पट शोधण्यात या संशोधकांना यश आले आहे.

संशोधनानुसार, हे खेळपट साधारणपणे इ.स. ८०० ते ११०० या कालखंडातील, म्हणजेच राष्ट्रकूट किंवा शिलाहार राजांच्या काळातील असावेत. अंदाजे १००० ते ११२५ वर्षांपूर्वीचे हे ऐतिहासिक अवशेष त्या काळी किल्ल्यांवरील सैनिक आणि स्थानिक लोकांच्या विरंगुळ्याचे व बौद्धिक कौशल्याचे प्रमुख साधन होते.

नुकतेच बिरवाडीगड या गडाच्या दक्षिणेकडे पायथ्याशी सुजल आणि रोशन यांना ५५हून अधिक मंकला पट सापडले आहेत. हे पट प्रामुख्याने किल्ल्यावरील सपाट कातळावर कोरलेले आहेत. तर काही दिवसांपूर्वी घोसाळेगड या गडाच्या पायथ्याशी सुरुवातीला ५५ मंकला पट नोंदवले गेले होते, मात्र अधिक सखोल संशोधनानंतर ही संख्या आता ६५ च्या पार गेली आहे. केवळ एका किल्ल्यावर मर्यादित न राहता, संपूर्ण रोहा परिसरात हा खेळ प्रचलित असल्याचे पुरावे या संशोधनातून समोर आले आहेत.

**काय आहे मंकला खेळ?**

मॅन्कला हा जगातील सर्वात

**खबरबात**
**धम्मशील सावंत**

प्राचीन खेळांपैकी एक मानला जातो. आशिया आणि आफ्रिका खंडात मोठ्या प्रमाणावर खेळला जाणारा हा खेळ व्यापारमार्ग आणि सैनिकांच्या हालचालींमुळे भारतात पोहचला. दगडावर समोरासमोर कोरलेल्या खड्ड्यांमध्ये बिया किंवा खडे टाकून हा बुद्धीला चालना देणारा खेळ खेळला जातो.

**संशोधकांचे योगदान**

सुजल पडवळ आणि रोशन म्हात्रे यांनी केलेल्या प्रत्यक्ष क्षेत्रीय अभ्यासामुळे किल्ल्यांवरील मानवी उपस्थिती आणि सामाजिक जीवनाचे नवे पदर उलगडले आहेत. हे अवशेष केवळ मनोरंजनाचे साधन नसून, ते आपल्या पूर्वजांच्या सांस्कृतिक प्रगल्भतेचे प्रतीक आहेत, असे मत संशोधकांनी व्यक्त केले आहे. या शोधामुळे रायगड जिल्ह्यातील किल्ल्यांच्या ऐतिहासिक महत्त्वात आणखी एक मोलाची भर पडली असून, दुर्गप्रेमींकडून या कार्याचे कौतुक होत आहे.


**संवर्धन होणे आवश्यक**

सुजल पडवळ व रोशन म्हात्रे यांनी सांगितले या गडकिल्ल्यांवरील ऐतिहासिक व सामाजिक संस्कृतीचा शोध घेणे हे आमचे ध्येय होते. बीरवाडी आणि घोसाळगडावर सापडलेले हे १२० हून अधिक खेळपट पूर्वजांच्या बौद्धिक कौशल्याची साक्ष देतात. हा हजार वर्षांपूर्वीचा अनमोल ऐतिहासिक ठेवा जगासमोर आणताना आम्हाला आनंद होत असून, त्याचे संवर्धन होणे हीच आमची इच्छा आहे.

# विख्यात वैद्य महर्षी अण्णासाहेब पटवर्धन

महर्षी अण्णासाहेबांचे घराणे मूळचे सरदारी बाण्याचे होते. कोकणात पेशव्यांच्या आरमाराचे अधिपती धुळप म्हणून होते. त्यांच्या पदरी अण्णासाहेबांचे पूर्वज फडणीसपदी काम करीत असत. त्यानंतर त्यांचे पिताश्री यांनी वकिलीची परीक्षा देऊन मुंबईत वकिली केली. तथापि, तेथील हवा न सोसल्याने त्यांनी पुण्यात शनिवारवाड्याजवळ घर बांधून तेथे हे कुटुंब राहावयास आले. त्यांचे वडील भाऊसाहेब हे एक रुबाबदार व्यक्तिमत्त्वाचे, विलासी स्वभावाचे होते. त्यांची पत्नी साध्वी जानकीबाई होत्या. यापण करारी आणि स्वाभिमानी होत्या, तसेच त्या तपस्वी व अत्यंत श्रद्धाळू होत्या. पटवर्धनांचे कुलदैवत गजानन होते.

त्या रोज ओंकारेश्वर, गुंडाचा गणपती व भिकारदास मारुतीच्या दर्शनाला जात असत. त्यांना मुली झाल्या; पण पुत्र संतान झाले नव्हते, म्हणून जानकीबाईंनी गुंडाच्या गणपतीला प्रदक्षिणा घातल्या. कठोर तपाचरण केले. त्याचे फळ म्हणजे वैशाख वद्य चतुर्थीला, शके १७६९ रोजी त्यांना पुत्ररत्न लाभले. त्याचे नाव 'विनायक' असे ठेवले, ते हे महर्षी अण्णासाहेब होत. त्यांच्या पाठीवर २-३ वर्षांनी त्यांना एक भाऊ झाला. त्याचे नाव नारायण होते. आईचा देवदर्शनाचा नेम ते अत्यंत श्रद्धेने करीत असत. अण्णासाहेबांचा विवाह दामल्यांच्या रमाबाई यांच्याबरोबर झाला. त्यांना एक मुलगा व एक मुलगी झाली.



अण्णासाहेब हे तैलबुद्धीचे होते आणि त्यांची अफाट स्मरणशक्ती होती. त्यांचे राहणीमान श्रीमंती थाटाचे व ऐटबाज होते. पुण्यात डेक्कन कॉलेजमध्ये बी.ए. पदवी संपादन केल्यावर पुढे सन १८६८ ते १८८० पर्यंत ते मुंबईस होते. तेव्हा त्यांनी एलएल.बी. व एल.एम. ॲण्ड एस. या लॉ व वैद्यकीय शिक्षणाच्या पदव्या संपादन केल्या. त्याबरोबर आयुर्वेदाचाही अभ्यास केला.

पुण्यात आल्यावर त्यांनी वैद्य महादेवशास्त्री लागवणकर यांच्याकडे आयुर्वेदाचे शिक्षण घेतले. वडिलांच्या सांगण्याप्रमाणे विनायकरावांनी प्रथम वकिलीचा व्यवसाय पुणे येथे राहून उत्तम प्रकारे केला. पुण्यात अण्णासाहेबांनी माधवराव नामजोशी यांच्या मदतीने 'किरण' नावाचे मराठी आणि 'डेक्कन स्टार' नावाचे इंग्रजी पत्रक सुरू केले. पुढे नामजोशींना ते काम जमेना म्हणून ते बंद झाले. पुढे 'केसरी' व 'मराठा' ही पत्रके सुरू झाली. ते मोठ्या अभिमानाने म्हणत असत की, ''या दोन्ही वर्तमानपत्रांचे डिक्लरेशन माझ्या हातचे आहे.'' ते मद्रासला एका प्रकरणाच्या कामानिमित्ताने सुमारे ३-४ वर्षे होते. मद्रासच्या वास्तव्यात त्यांची भेट रामचंद्र अय्यास्वामींशी पडली. त्यांच्यामुळे कांचीपीठाशी त्यांचा संपर्क झाला होता. त्या वेळी त्यांना अनेक प्रकारच्या मंत्रशास्त्राची माहिती झाली होती. त्याच वास्तव्यात त्यांना घटसर्पाच्या आजारातून अंतकाळचा देखावा दिसला. त्यातून ते बरे झाले; पण त्यांच्यात फार मोठे परिवर्तन झाले. ते केवळ पंचा-उपरण्यावर राहू लागले. डोक्यास मुंडासे बांधत असत. मुलांच्या मुंजीनिमित्ताने ते पुण्यास आले; परंतु तेथून परत कोठेही गेले नाहीत.

मद्रासहून १८८४ साली पुण्याला परत आल्यावर १९१७ पर्यंत म्हणजे ३३ वर्षे ते अशा उन्मनी स्थितीत होते. १९०२ साली त्यांच्या पत्नी निवर्तल्या. त्यानंतर शके १८३९ माघ शुद्ध एकादशीस, १९१७ साली त्यांनी देह सोडला.

**-डॉ. अजित कुलकर्णी**




# विवो फ्लॅगशिप स्मार्टफोन भारतात लॉन्च

टेक कंपनी Vivo ने भारतीय बाजारात आपला नवीन प्रीमियम फ्लॅगशिप स्मार्टफोन Vivo X200T लॉन्च केला आहे. फोनचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याचा 100x डिजिटल झूम असलेला पेरिस्कोप टेलीफोटो लेन्स, मीडियाटेक डायमेंसिटी 9400+ प्रोसेसर आणि 6200m-h ची मोठी बॅटरी .हा या मालिकेतील चौथा मॉडेल आहे, यापूर्वी कंपनीने द२००, द२०० FE आणि द२०० प्रो बाजारात आणले आहेत.



Vivo X200T दोन स्टोरेज व्हेरिएंटमध्ये लॉन्च करण्यात आला आहे. त्याच्या २५६GB मेमरी व्हेरिएंटची किंमत ५९,९९९ आणि ५१२GB स्टोरेज व्हेरिएंटची किंमत ६९,९९९ ठेवण्यात आली आहे.

Vivo X200T ची विक्री ३ फेब्रुवारीपासून सुरू होईल. लॉन्च ऑफरमध्ये यावर ५,००० चा बँक डिस्काउंट मिळेल. डिझाइन: प्रीमियम ग्लास बॉडी आणि IP69 रेटिंग

फोनचे डिझाइन अत्यंत स्लीक आणि आधुनिक आहे. त्याच्या मागील पॅनलवर मोठा गोलाकार कॅमेरा मॉड्यूल दिला आहे जो टेक्सचर्ड फिनिशसह येतो.

मटेरियल आणि रेटिंग: फोनमध्ये मेटल फ्रेम आणि प्रीमियम ग्लासचा वापर केला आहे. हे IP६८ आणि IP६९ रेटिंगसह येते, जे त्याला धूळ आणि खोल पाण्यासोबतच हाय-प्रेशर वॉटर स्प्रेपासूनही सुरक्षित ठेवते.

डिस्प्ले आणि बेझल्स: समोर 1.5K फ्लॅट डिस्प्ले आहे, ज्याचे बेझल्स खूप पातळ आहेत. यात सेंटर पंच-होल सेल्फी कॅमेरा दिला आहे. हे स्टेलर ब्लॅक आणि सीसाइड लिलॅक कलर पर्यायांमध्ये खरेदी करता येईल.पोर्ट्स आणि बटणे: उजव्या बाजूला पॉवर बटण आणि व्हॉल्यूम रॉकर आहेत. खालील बाजूस USB टाइप-C पोर्ट, सिम ट्रे आणि स्पीकर ग्रिल दिली आहे. सुरक्षिततेसाठी यात ३ऊ अल्ट्रासोनिक इन-डिस्प्ले फिंगरप्रिंट सेन्सर मिळतो, जो ओल्या हातांनीही काम करतो.

फोटोग्राफीसाठी फोनच्या मागील पॅनलवर ट्रिपल रियर कॅमेरा सेटअप देण्यात आला आहे. कार्यक्षमतेसाठी मीडियाटेक डायमेन्सिटी 9400+ ऑक्टा-कोर प्रोसेसर देण्यात आला आहे.

# ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर केतकर



**निमित्त**

मराठीतील पहिले ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांचा आज (२ फेब्रुवारी) जन्मदिन. मराठी संस्कृतीने ज्ञानाची जी रत्ने जगाला दिली, त्यातलेच हे एक अमूल्य रत्न! १८८४मध्ये तेव्हाच्या मध्य भारतात त्यांचा जन्म झाला, पण शालेय शिक्षण अमरावतीत व उच्च शिक्षण मुंबईच्या विल्सन कॅालेजात झाले. पुढे अमेरिकेतील कॉर्निल विद्यापीठाची डॉक्टरेट त्यांनी मिळवली.

अमेरिकेतून परत येत असताना मे १९११ ते सप्टेंबर १९१२ या काळात डॉ. श्रीधर केतकरे इंग्लंडला होते. इंग्लंडमधेच त्यांचा इंडिथा कोहन या जर्मन तरुणीशी परिचय झाला. पुढे १९२०मध्ये प्रचंड सामाजिक विरोधांचा तोंड देत डॉ. केतकरांनी त्यांच्याशी विवाह केला व त्यांचे नाव शीलावती केतकर असे बदलले.

भारतात परतून डॉ. केतकर कलकत्ता विद्यापीठात अध्यापन करू लागले, पण एन्सायक्लोपिडिया ब्रिटानिकाच्या धर्तीवर मराठीत ज्ञानकोश असावा ही इच्छा त्यांना अस्वस्थ करीत राहिली. त्यामुळेच ते पुण्यात आले व ज्ञानकोश निर्मितीच्या कामाला लागले.

डॉ. केतकर त्यांच्या ज्ञानकोशांचे प्रमुख संपादक होते. ज्या काळात केतकरांनी ज्ञानकोशाच्या २३ खंडांचे काम केले तो काळ १९१६ ते १९२८ हा आहे. या काळात खुद्द लोकमान्य टिळकांनीसुद्धा त्यांना 'हे काम फार मोठे आहे, एका माणसाचे हे काम नाही' अशा प्रकारचा सल्ला दिला होता, पण केतकरांचा निर्धार पक्का होता. त्या निर्धाराला चिकटून सर्व संकटांवर मात करीत त्यांनी १२ वर्षांमध्ये हा ऐतिहासिक महत्त्वाचा मराठी प्रकल्प पूर्ण केला.

डॉ. केतकरांनी ज्ञानकोशाचे काम सुरू केले तेव्हा त्यांच्यापुढे पथदर्शक म्हणून 'एनसायक्लोपीडिया ब्रिटानिका'सारखा एखादा इंग्रजी ज्ञानकोशच तेवढा होता. गुजराथी, तेलुगू यांसारख्या काही भारतीय भाषांमध्ये ज्ञानकोश निर्मितीचे काम होत आहे अशी चिन्हे वा चर्चा तेव्हा होती, पण मराठी ज्ञानकोशाला पथदर्शक ठरू शकतील अशी त्यांची स्थिती नव्हती. एवढ्या मोठ्या प्रकल्पासाठी आवश्यक असणारी पुरेशी आर्थिक ताकद वा साधनसामग्री आपल्याकडे नाही याची जाणीव त्यांना होती. तरीही एकांड्या शिलेदाराप्रमाणे त्यांनी पदरचे सारे पैसे टाकून कामाला सुरुवात केली व या कार्याला आकारही दिला.

गोंडवनातील प्रियंवदा (१९२६), ब्राह्मणकन्या (१९३०) इ. सात कादंबऱ्या १९२६ ते ३७ या काळात लिहून केतकरांनी मराठी ललित साहित्यात वैशिष्ट्यपूर्ण भर घातली. त्यांच्या कादंबऱ्या इतर कादंबऱ्यांहून अगदी वेगळा अनुभव वाचकांना देतात.त्यांचे कौटुंबिक जीवन आर्थिक ओढाताणीचे पण समाधानी होते. १९२६ साली शारदोपासक संमेलनाचे व १९३१ साली महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.डॉ. केतकर वयाच्या केवळ ५३व्या वर्षी पुण्याच्या ससून इस्पितळात १० एप्रिल १९३७ रोजी इहलोक सोडून गेले. एक जखम चिघळल्याचे निमित्त होऊन ते मृत्युमुखी पडले. त्यांच्या अंत्यविधीसाठी त्यांच्या पत्नीला १०० रुपये उसने मागण्याची वेळ आली, अशी नोंद त्यांच्या चरित्रात आहे. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धाच्या काळात मराठी ज्ञानकोश निर्मितीसाठी त्यांनी केलेला त्याग अनन्यसाधारण आहे. **(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यामध्ये वजन का वाढते?

थंडीमध्ये माणूस खा-खा करतो, भरपूर खातो याचे अजून एक वेगळे स्पष्टीकरणसुद्धा दिले जाते. बर्फाळ प्रदेशामधील अस्वलं सहा महिने भरपूर आहार घेतात आणि शरीरामध्ये चरबीचा मुबलक साठा करुन ठेवतात, कारण पुढचे सहा महिने बर्फ पडत असताना त्यांना अन्न मिळणार नसते. भविष्यात अन्नाचे दुर्भिक्ष्य होईल तेव्हा शरीरामध्ये जमवलेल्या चरबीच्या साठ्यावरच शरीर जिवंत ठेवायचे असते. याच प्रकारची मनोधारणा मनुष्याची थंडीच्या मोसमात होत असावी अशी शक्यता आहे, कारण कधीकाळी मनुष्यप्राणीसुद्धा बर्फाळ प्रदेशामध्ये राहत होता. बर्फ पडणाऱ्या ऋतूमध्ये अन्नाची होणारी कमी मानवानेही हजारो वर्षे अनुभवली आणि त्यावर उपाय म्हणून जेव्हा अन्न मुबलक उपलब्ध होईल तेव्हा अतिसेवन करुन शरीरामध्ये चरबी जमवून ठेवायची असा मानवाचाही इतिहास आहे.



थंडीच्या दिवसांमध्ये मनुष्य हिमयुगातील भविष्यात अन्न न मिळण्याच्या भयस्मृतिंना अनुसरुन अतिप्रमाणात अन्नसेवन करतो, जी सवय आधुनिक जगात स्थूलत्वास कारणीभूत होत आहे. समजा एखाद्या शरीराची दिवसाची ऊर्जेची सरासरी गरज आहे २००० उष्मांक (कॅलरीज) म्हणजे आपली नित्य कामे-व्यवहार करण्यासाठी (शरीरयष्टीचा-दिनचर्येचा-कामकाजाचा-व्यायामाचा वगैरे विचार करता) त्या शरीराने २००० उष्मांक मिळतील एवढा आहार घ्यायला हवा. आता या गरजेच्या उष्मांकांपेक्षा अधिक प्रमाणात घेतला जाणारा आहार हा त्या शरीरासाठी अतिरिक्त आहार आहे. थंडीमध्ये तर आपण जवळजवळ २०० ते ४०० कॅलरीजच्या आसपास उष्मांक देणारा अतिरिक्त आहार घेतो अशी शंका आहे. हे २०० ते ४०० अधिकचे उष्मांक शरीर चरबीच्या रुपामध्ये साठवून ठेवते

आजच्या आहार-संपन्न काळात अन्नाच्या दुर्भिक्ष्याचा कधीच सामना करावा लागणार नसल्याने शरीराला पुढील बेगमीसाठी म्हणून केलेल्या या चरबीचा वापर करण्याची कधीच वेळ येत नाही. त्यात अधिक हिवाळ्यात शरीराचे चलनवलन कमी होत असल्याने सेवन केलेल्या आहाराची ऊर्जा वापरलीसुद्धा जात नाही. ती उर्जा चरबीच्या स्वरुपात शरीरातच साठवली जाते. आणि शरीरावर चरबीचे थरावर थर जमत जातात. आहाराच्या-उर्जेच्या-चरबीच्या बचतीचा साठा वाढतच जातो, तो इतका की एक दिवस शरीर चरबीच्या साठ्याने ठासून भरते म्हणजेच आकाराने, वजनाने मोठे होते,स्थूल-जाडजूड-वजनदार होते.

# भाजप उमेदवारांना विजयी केल्यास पोलादपूरचे मागासलेपण पुसण्याची जिद्द मिळेल -आमदार दरेकर





**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेत लोहारे गटातून निवडून दिलेल्या शिवसेना उमेदवारांना जिल्हा परिषदेच्या सदस्याची कामे काय, हे देखील माहिती नसल्याचे त्यांच्या आजपर्यंतच्या कारभारावरून दिसून येत आहे. त्यामुळे सेवाभावी वृत्तीचे वैद्यकीय देवदूत लोहारे गटाचे कृष्णा कदम, कोतवाल बुद्रुक गणाचे सुरेंद्र चव्हाण यांच्यासह राष्ट्रवादीचे लोहारे गणाच्या युगाज्ञा उतेकर, कापडे बुद्रुक गटाचे अजय सलागरे आणि कापडे बुद्रुक गणाचे अनिल मालुसरे, माटवण गणाच्या राकाँ शप उमेदवार हर्षदा वरवाटकर यांना विजयी केल्यास पोलादपूर तालुक्याचा मागासलेपणा पुसण्याची जिद्द मिळेल, अशी भूमिका कॅबिनेट दर्जाचे आ.प्रवीण दरेकर यांनी लोहारे येथील प्रचारसभेप्रसंगी मतदारांसमोर मांडली.

याप्रसंगी व्यासपिठावर भाजप-राष्ट्रवादी काँग्रेस व राकाँ-शप उमेदवारांसह मुंबई मनपा नगरसेवक प्रकाश दरेकर, भाजपचे जिल्हा नेते ॲड.आस्वाद पाटील, नागेंद्र राठोड, माजी राजिप सदस्या अपर्णा जाधव, मुरलीधर दरेकर, अनिल नलावडे, रिपाइंनेते यशवंत मोरे, कृष्णा करंजे, माजी सभापती दिलीप भागवत, दत्ता उतेकर, विनोदराव मोरे, नगरसेविका श्रावणी शहा, दर्पण दरेकर, प्रसन्ना पालांडे, दीपक उतेकर तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी पैठणपाठोपाठ लोहारे येथेही आ.दरेकर यांनी, देवळे गटातून निवडून आल्यानंतर लोहारे गटातून निवडणूक लढून झाल्यावर महामार्गालगत शिवसेनेचे कळंबे यांचा वेळ कुठे पत्ते खेळण्यात जातोय, याबाबत माहिती मिळाली. केमिकल, स्टील आणि भंगार चोरीबाबत कोणाचे सहकार्य आहे, याबद्दलही खुली चर्चा आहे. कोणती कामे कोणकोणत्या हेड खाली दोनवेळा दाखवून बिले काढली आणि कोणती कामे न करताच बिले काढली याबाबत कृष्णा कदम निवडून आल्यावर चौकशी करायला लावतील, असे भ्रष्टाचाराचे बॉम्बगोळेही प्रतिस्पधी उमेदवारांविरोधात सोडले.

यावेळी ॲड.आस्वाद पाटील यांनी आम्ही भाजपप्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यावतीने निर्णय घेताना आमची ओळख रवींद्र चव्हाण अशी झाली आहे तर मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत असणारे प्रवीण दरेकर यांची ओळख फडणवीस अशी झाली असल्याने त्यांना मुख्यमंत्रीच म्हटले तरी चालेल. मागील वेळी कृष्णा कदम यांना ओळखतही नसताना त्यावेळीच्या राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवारांचा अर्ज मागे घेण्यासाठी माजी जिल्हा परिषद सदस्या अपर्णा जाधव यांना अनेकदा फोन करून विनंती केली. त्यांनी ऐकले असते तर लोहारे गटाला मागील वेळीच कृष्णा कदम सारखे जिल्हा परिषद सदस्य लाभले असते आणि आता प्रचाराची त्यांची दुसरी वेळ असती, अशी शक्यता व्यक्त केली.

यावेळी मनोज भागवत, यशवंत मोरे, दिलीप भागवत, प्रकाश दरेकर, दीपक उतेकर, कृष्णा कदम यांची समयोचित भाषणे झाली.

# खालापुरात 'उबाठा'ची अस्तित्वासाठी धडपड

**खालापूर : प्रतिनिधी**

एकेकाळी शिवसेनेचं निर्विवाद वर्चस्व असलेला खालापूर तालुक्यात जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत दोन्ही शिवसेनेची कसोटी लागणार असून ठाकरे सेनेसाठी ही अस्तित्वाची निवडणूक आहे.

चारहि जिल्हा परिषद गट आणि आठ पंचायती समिती गणात सर्व उमेदवार निवडून आणून खालापूर तालुका शिवसेनेचा बालेकिल्ला आहे हे शिवसैनिक आणि अनेकदा दाखवून दिले होते, मात्र २०१७ च्या निवडणुकीत या बालेकिल्लाला सुरुंग लागला. त्यानंतर राज्यातील घडामोडी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे झालेले विभाजन यानंतर प्रथमच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. विभाजनाचा सर्वाधिक फटका ठाकरे सेनेला बसला आहे.

महेंद्र थोरवे यांच्या रूपात कर्जत खालापूरचा आमदार शिंदे शिवसेनेचा असून ठाकरे सेनेतील मंडळींनी मागील वेळी विधानसभेत पराभवाचे तोंड पाहिले आहे. सर्व प्रमुख वजनदार नेते शिंदे शिवसेनेत गेल्यानंतर ग्रामीण भागात शिवसेना ठाकरे गट काही ठिकाणी लढत देत आहे. ठाकरे सेना तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, शेतकरी कामगार पक्ष, काँग्रेस यांच्यासोबत परिवर्तन आघाडीत एकत्र आहे.

# निवडणूक ही धावण्या-बोलण्याची नाही तर बुद्धीची स्पर्धा -ॲड.साबळे

**माणगाव : बातमीदार**

निजामपुर जिल्हा परिषद मतदार संघात वातावरण तापले आहे. एकमेकांवर आरोप केले जात आहेत. या मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार ॲड. राजीव साबळे यांच्यावरही टीका झाली. या टीकेला ॲड. राजीव साबळे यांनी माणगाव मध्ये रविवार दि. १ फेब्रुवारी रोजी पत्रकार परिषद घेऊन उत्तर दिले. ते पत्रकार परिषदेमध्ये म्हणाले की, निवडणुक ही धावण्याची व बोलण्याची स्पर्धा नाही तर बुद्धीची स्पर्धा आहे. चालण्यापेक्षा बुद्धी असणे महत्त्वाचे लोकांची कामे केली म्हणून मला लोकांनी चार वेळा जिल्हा परिषदेसाठी निवडून दिले.



भरत गोगावले यांच्या आईचे नाव नर्सिंग कॉलेजला देण्याचा निर्णय हा माझा वैयक्तिक नव्हता तर तो माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचा होता. गोगावले यांनी कबूल केलेली एकही गोष्ट पूर्ण केली नाही. परवानगीसाठी मला सुनील तटकरे यांचे पाय धरावे लागले. शिक्षण क्षेत्रात फी घेतल्याशिवाय शिक्षण देताच येत नाही. भरत गोगवले यांनी एकही शिक्षण संस्था काढलेली नाही. त्यामुळे त्यांना शिक्षण क्षेत्राचे ज्ञान नाही. राजकारणात मी भरत गोगावले यांच्यापेक्षाही सीनियर आहे. मला प्रशासकीय ज्ञान आहे. माझ्या अपंगात्वावर बोलण्याची वेळ तुमच्यावर येईल असे मला वाटले नव्हते.

# चौल येथील वृद्ध महिलेच्या खुनाचा ४८ तासांत उलगडा; जावयासह चौघे ताब्यात

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीतील चौल येथील टेकाळकर आळी येथे राहणाऱ्या ७० वर्षीय वृद्ध महिलेच्या खून व जबरी चोरी प्रकरणाचा रायगड पोलिसांनी अवघ्या ४८ तासांत उलगडा केला असून, मयत महिलेचा जावई असलेल्या मुख्य आरोपीसह चौघांना ताब्यात घेण्यात आले आहे.

मंदा प्रमोद म्हात्रे (वय ७०) या वृद्ध महिला चौल, ता. अलिबाग येथे एकट्याच राहत होत्या. दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजण्याच्या पूर्वी अज्ञात व्यक्तींनी त्यांच्या घरात प्रवेश करून त्यांचा खून केला व अंगावरील सोन्याचे दागिने जबरी चोरीने लंपास केले. या प्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात दिनांक २९ जानेवारी २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक आँचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी माया मोरे (अलिबाग विभाग) व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक तयार करण्यात आले.

सपोनि भास्कर जाधव, सपोनि मानसिंग पाटील, सपोनि भैरु जाधव, तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार - अमोल हंबीर, अमोल म्हात्रे, अक्षय पाटील, प्रदीप खरात, रवि मुंडे, शरद फरांदे, विनोद पाटील, तुषार घरत (सायबर), रुपेश निगडे, सचिन वावेकर, प्रशांत लोहार आदींच्या पथकाने कौशल्यपूर्ण तपास व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींचा माग काढला.

तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी क्र. १ महादेव ऊर्फ शिवा राधाकिसन ढोबळे (वय २५, रा. जाटदेवळा, ता. पाथडी, जि. अहिल्यानगर) यास आष्टी, जि. बीड येथून ताब्यात घेण्यात आले. आरोपी क्र. २ अशोक अजिनाथ भोसले (वय १९) व आरोपी क्र. ३ गणेश उत्तम पंडागळे (वय २५) यांना जाटदेवळा, ता. पाथडी, जि. अहिल्यानगर येथून अटक करण्यात आली. तर आरोपी क्र. ४ शुभम एकनाथ पवार (वय २३, रा. माणिक दवंडी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) यास पेण, जि. रायगड येथून ताब्यात घेण्यात आले.

प्राथमिक तपासात आरोपी महादेव ऊर्फ शिवा ढोबळे हा मयत महिलेचा जावई असल्याचे निष्पन्न झाले आहे. वृद्ध महिला घरात एकट्या राहत असल्याची माहिती आरोपींना होती. त्याचा फायदा घेत आरोपींनी घरात प्रवेश करून खून व चोरी केल्याचे तपासातून समोर आले आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास रेवदंडा पोलीस ठाण्याचे सपोनि भैरु जाधव करीत असून, आरोपींनी खून नेमक्या कोणत्या कारणास्तव केला, तसेच चोरीस गेलेले सोन्याचे दागिने हस्तगत करण्याबाबतचा तपास सुरू आहे.

# पाटणसई येथे राष्ट्रवादी-भाजप युतीची प्रचार बैठक उत्साहात



**नागोठणे : बातमीदार**

रायगड जिल्हा परिषद व रोहा पंचायत समितीच्या पंचवार्षिक सार्वत्रिक निवडणुकीतील प्रचाराचा धुमधडाका नागोठणे विभागात सर्वत्र दिसून येत आहे. अशाच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व भारतीय जनता पार्टीचे नागोठणे जिल्हा परिषद गटाचे उमेदवार किशोर जैन व सुकेळी पंचायत समिती गणाच्या उमेदवार सौ. योगिता शिद यांच्या प्रचारार्थ पाटणसई येथे रोहा पंचायत समितीचे माजी सभापती सदानंद गायकर यांच्या निवासस्थानी शनिवारी (दि.३१) संपन्न झालेल्या प्रचार बैठकीला पाटणसई ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे पहावयास मिळाले. या बैठकीच्या निमित्ताने किशोर जैन व योगिता शिद यांना मोठे मताधिक्य देण्याचा निर्धार पाटणसई ग्रामस्थांनी केला.

या बैठकीत सर्व ग्रामस्थांनी जाहीर पाठिंबा देत किशोर जैन व योगिता शिद यांना मनापासून शुभेच्छा दिल्या. विकास, विश्वास आणि एकजुटीचा ठाम संदेश या सभेतून स्पष्टपणे समोर आला असून उपस्थित ग्रामस्थांची संख्या पाहता येथील एकजूट मजबूत आहे, दिशा स्पष्ट आहे आणि त्यामुळे आमचा विजय निश्चित आहे असा विश्वास यावेळी उमेदवार किशोर जैन यांनी व्यक्त केला. तर रोहा पंचायत समितीचे माजी सभापती आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे विभागीय नेते सदानंद गायकर यांनी आपल्या मनोगतात पाटणसई गावातून किशोर जैन व योगिता शिद यांना कधी नव्हे एवढे मोठे मताधिक्य देणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक प्रचाराच्या अनुषंगाने पाटणसई गावात पार पडलेल्या या निर्णायक बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे विभागीय नेते भाईसाहेब टके, शिवरामभाऊ शिंदे, सदानंद गायकर, मधुकर ठमके, उमेदवार किशोरभाई जैन, योगिता शिद, संजय भोसले,भाजपाचे ज्येष्ठ नेते महादेव मोहिते, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांबेकर, तालुका महामंत्री एकनाथ ठाकूर, हेमंत गायकर, पांडुरंग गायकर, सचिन कळसकर, भाई शिर्के, हरिश्चंद्र तेलंगे, मधुकर गायकर, मारुती शिर्के, अकबर पठाण, विकास म्हात्रे आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस व भारतीय जनता पक्षाच्या युतीचे प्रमुख पदाधिकारी, युतीचे विभागातील सरपंच, उपसरपंच यांच्यासह पाटणसई गावातील ग्रामस्थ व महिला यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# वावंढळ येथील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता



**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील वावंढळ या कोयना प्रकल्पग्रस्तग्रस्त गावात ५७ वा अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली.

सातारा जिल्ह्यातील कोयना जांब्रुक हे गाव कोयना धरणामुळे विस्थापित होऊन या गावची वसाहत खालापूर तालुक्यातील वावंढळ येथे या गावचे दूरदृष्टी असलेले आणि ज्येष्ठ सामाजिक नेते कैलासवासी जे.आर.तथा जयसिंगराव राजबाराव कदम यांनी वसवली आहे. मूळ गावात सुरू असलेली सप्ताह ची सुरुवात नवीन गावात देखील आपली संस्कृती, परंपरा कायम ठेवून अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा जोपासली जात आहे.राज्यातील नामवंत प्रवचनकार, कीर्तनकार यांची सात दिवस सेवा झाली. सात दिवस ज्ञानेश्वरी पारायण करण्यात आले.

दररोज काकडा आरती, हरिपाठ आणि जागर भजन नित्य नियमाने करण्यात आले. तर ज्ञानेश्वरी १८ वा अध्याय वाचण्यासाठी अनेक भाविक उपस्थित होते, महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रम आयोजिण्यात आला होता. सायंकाळी दिंडी प्रदक्षिणा, ज्ञानेश्वरी पूजन, दीपोत्सव उत्साहात साजरा झाला.

# मुरूडच्या दत्त मंदिरात दत्तयाग, लघुरुद्र कार्यक्रम

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड येथील प्राचीन श्री दत्त मंदिरात सालाबादप्रमाणे श्रीदत्तयाग व लघुरुद्र कार्यक्रमाचे आयोजन सोमवार दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ६ वाजल्यापासून पूजेला सुरुवात होणार असून, त्यानंतर दुपारी १२ वाजता महाआरती होणार आहे.तद्नंतर दुपारी १२.३० ते ३ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.तसेच भक्तगणांना

महाप्रसादाकरिता श्रीक्षेत्र दत्तमंदिर येथे जाण्यासाठी वाहनांची व्यवस्था सुद्धा करण्यात आली आहे. सायंकाळी ६ वाजता भागवताचार्य ह.भ.प. ज्ञानेश्वरदास सावर्डेकर महाराज, आळंदी यांची दत्त महात्म्यपर कथा होणार आहे. कथेनंतर उपस्थित सर्व भाविकांच्या हस्ते मंदिरामध्ये असणाऱ्या प्राचीन दत्त मूर्तीवर बेलपत्रांचे मंत्र उच्चारांमध्ये अर्चन होणार आहे.



कार्यक्रमाची सांगता झाल्यानंतर उपस्थित सर्व भाविकांना श्रीक्षेत्र गाणगापूर येथील निर्गुण पादुकांवर लेपन केलेले चंदन, तसेच श्रीक्षेत्र कुरुवपूर येथून आणलेले भस्म आणि श्रीक्षेत्र उज्जैन येथे सिद्ध केलेले रुद्राक्ष प्रसाद म्हणून देण्यात येणार आहे. बेलपत्र पूजा जोडपे किंवा एकटी व्यक्ती अशा सर्वांसाठी आसणार

नावनोंदणी करून बेलपत्र अर्चन पूजेसाठी उपस्थित राहणाऱ्या भाविकांनाच भेटरूपी सिद्ध रुद्राक्ष आणि प्रसाद-वस्तू दिल्या जाणार आहेत.सायंकाळ कार्यक्रमाची सांगता महाआरतीने होणार आहे. याकरिता आरती साठी सर्व भाविकांनी आपल्या सोबत ताम्हण, निरंजन(साजूक तूपवाती सह) आणि धूप-कापूर आणायचे आहे.तरी सर्व भाविकांनी या पर्वकाळाचा लाभ घ्यावा.ही विनंती अध्यक्ष प्रमोद भायदे उपाध्यक्ष वसंत पाटील, सचिव आदेश दांडेकर, खजिनदार रामचंद्र आरेकर

श्री दत्तदेवस्थान ट्रस्ट मुरुड-जंजिरा व कार्यकारीणी सदस्य श्री दत्त देवस्थान पुजा समिती व उत्सव समिती यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# चौक जिल्हा परिषद मतदारसंघात महायुतीचा एल्गार, दिग्गज नेते प्रचारात सक्रिय

**चौक : प्रतिनिधी**

चौक जिल्हा परिषद मतदार संघात महायुतीचे दिग्गज नेते प्रचारात सक्रीय झाल्याने विरोधक यांच्यात चलबिचल सुरू झाली आहे. हा जिल्हा परिषद मतदार संघ महायुतीचा बालेकिल्ला आहे, तो ठेवण्यासाठी दिग्गज नेते प्रचारात सक्रीय झाले आहेत.

रायगड जिल्हा परिषद प्रभाग १५ चौक हा आदिवासी महिला राखीव, खालापूर पंचायत समिती गण २९ आदिवासी महिला तर ३० हा गण आदिवासी राखीव झाला आहे.हे दोन्ही गण आदिवासी राखीव झाले असून दोन्ही गण आणि गट आदिवासी राखीव झाले आहेत.चौक जिल्हा परिषदसाठी महायुती कडून संगीता विजय निरगुडा,२९ गणातून अरुणा पारधी तर ३० गणातून रितेश बळीराम जाधव हे उमेदवार आहेत.१५ चौक जिल्हा परिषद गटातील जवळपास सर्वच ग्राम पंचायत महायुतीच्या ताब्यात आहेत. चौक मधून मागील तीन जिल्हा परिषदेच्या निवडणुका मोतीराम ठोंबरे यांनी जिंकल्या आहेत.

भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे व माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे यांची आदिवासी भागात मोठी पकड आहे, अनेक योजना त्यांच्या माध्यमातून आदिवासी भागात राबविण्यात आल्या आहेत. येथील आदिवासी मुलांना शाळेत जाण्यासाठी आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून मोफत स्कूल बस सुरू करण्यात आली आहे.

चौक जिल्हा परिषद प्रभाग क्रमांक १५ मधून घरभेटी घेऊन मतदारांशी प्रत्यक्ष संपर्क साधला जात आहे. भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, तालुका मंडळ अधिकारी प्रवीण मोरे, माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, आरपीआयचे महेंद्र धनगावकर चौक पंचायत समिती प्रमुख जगदीश हातमोडे, चौक अध्यक्ष गणेश कदम, गिरीश जोशी,चौक सरपंच रितू ठोंबरे, उप सरपंच पूजा हातमोडे,जेष्ठ नेते सुनील गायकवाड, अरुण पारठे, वृषाली पोळेकर, रवी बांगारा, चौक भाजप उपाध्यक्ष सागर ओसवाल, अजिंक्य देशमुख, पिंट्या राणे, बाळा ठाकूर, अमोल कदम, सचिन मते, दर्शन पोळेकर, राजन गावडे,महिला, आदिवासी बांधव, भाजप, शिवसेना, आरपीआयचे कार्यकर्ते दाखल झाले आहेत.



## जाहिर नोटीस

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. पनवेल, जि. रायगडं, यांचे समोर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली दाखल दावा नोटीस**

श्री कुलस्वामी को ऑप. केडीट सोसायटी लि. या संस्थेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १०१ अन्वये खालील व्यक्ती विरूध्द थकित कर्जाचा भरणा केला नसल्याचे नमुद करून वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली, तथापि खालील नमुद व्यक्तींना सुनावणी नोटीसची पोहोच होत नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार म्हणणे दाखल करण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे. या जाहीर नोटीसीव्दारे आपणास पुन्हा एक संधी देण्यात येत असून सदर दाव्याबाबन अंतिम सुनावणी दि.०९/०२/२०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता ठेवण्यात आली असुन सदर सुनावणीस आपण स्वतः वा आपले प्रतिनीधी मार्फत उपस्थित रहावे. आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याचा निकाल केल्या जाईल व नंतर आपले कोणतेही म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही.

| अ.क. | दावा क्र. | प्रतिवादीचे नाव | पत्ता | थकीत कार्ज |
|---|---|---|---|---|
| १) | ३७५/२०२५-२०२६ | श्री. हिरामन बबन घायतडके | फ्लॅट नं बी-९०४, नववा मजला, श्रीराम आर्केड, प्लॉट ३०/३१/३२,सेक्टर-२० कामोठे ४१०२०६. | ७२७८५/- |
| २) | ३७६/२०२५-२०२६ | श्री. प्रदिप विलास महाडीक | शिवशक्ती सेवासंघ, न्यु गौतम नगर, प्लॉट नं ४, हनुमान मंदिराजवळ गोंवडी मुंबई ४०००४३. | ७११४६/- |

सदरची नोटीस माझे सही शिक्क्यानिशी दिली आहे.

स्थळ : पनवेल.
दिनांक :- २८/०१/२०२६.

(शिक्का)

सही/-
(श्रीम. भारती काटुळे)
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, पनवेल, जि. रायगड.

# नवी मुंबईत सातत्यपूर्ण डीप क्लिनिंग मोहीम

## विशेषत्वाने मैदाने आणि मोकळ्या जागांची साफसफाई

**नवी मुंबई : बातमीदार**



शहरातील हवा गुणवत्ता सुधारण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बांधकामांवरील वायू प्रदूषण नियंत्रणावर विशेष लक्ष देण्याप्रमाणेच हिवाळी कालावधीत हवेत धुक्याबरोबरच धूळीचेही वाढलेले प्रमाण लक्षात घेऊन ठिकठिकाणी डीप क्लीनिंग मोहिमा प्रभावीपणे राबवल्या जात आहेत.

यामध्ये 'रस्ते स्वच्छता व धूळ नियंत्रणा'कडे अधिक काटेकोर लक्ष दिले जात असून त्यासोबतच नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मैदाने तसेच मोकळ्या जागा साफसफाईची विशेष मोहीम हाती घेण्यात आलेली आहे.

अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली संपूर्ण स्वच्छता विभाग धूळ प्रदूषण नियंत्रणासाठी कृतीशील झालेला आहे. त्यासोबतच आयुक्त महोदयांच्या निर्देशानुसार सर्व विभाग कार्यालयांच्या स्तरावर सहाय्यक आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली वायू प्रदूषण प्रतिबंधात्मक कार्यवाहीसाठी शहर अभियंता श्री.शिरीष आरदवाड यांच्या मार्गदर्शनानुसार अभियंते व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ अजय गडदे यांच्या मार्गदर्शनानुसार स्वच्छता अधिकारी यांची पथके कार्यान्वित करण्यात आली असून सखोल स्वच्छता मोहीमांप्रमाणेच धूळ प्रतिबंधक उपाययोजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत.

या मोहिमेंतर्गत २९ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ या कालवधीत साधारणतः ६ टनाहून अधिक धूळ, माती व राडारोडा उचलून नेण्यात आला आहे. प्राधान्याने १२ मुख्य रस्त्यांवर १० कि.मी. पेक्षा अधिक अंतराच्या रस्त्यांची सखोल स्वच्छता करण्यात आली आहे. रस्ते हे धूळ, माती उचलून स्वच्छ केल्यानंतर ते जेटींग मशीन व एनकॅप फॉगर्स वाहनांव्दारे धुवून स्वच्छ केले जात आहेत. यांत्रिक सफाई मशीन वाहनांव्दारे दैनंदिन २२३ किमी मुख्य रस्त्याची साफसफाई करण्यात आलेली आहे.

यामध्ये आम्र मार्ग, ठाणे– बेलापूर मार्ग, सायन–पनवेल हायवे वाशी, एमआयडीसी क्षेत्रातील गवळीदेव मार्ग, पामबीच मार्ग, कोपरखैरणे – घणसोली पामबीच मार्ग, पामबीच सर्व्हिस रोड, सानपाडा परिसर, तुर्भे वार्ड लुब्रिजोल कंपनी समोरील फायजर रोड, तुर्भे एमआयडीसी रोड, गणपती पाडा मुख्य रस्ता, रबाळे एमआयडीसी, निबाण टेकडी ते साईप्रसाद हॉटेल परिसर घणसोली, दिवानाका ते मुरबादेवी चौक रबाळे, घणसोली रस्त्यांची त्याचप्रमाणे बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणांची व परिसराची सखोल स्वच्छता करण्यात आली. यापुढेही ही कार्यवाही सुरूच राहणार आहे.

यामध्ये रस्त्याच्या पृष्ठभागाची ब्रशने स्वच्छता करणे व जमा झालेली माती वाहून नेणे, स्वच्छ केलेल्या रस्त्यांवर प्रक्रियाकृत पाणी स्प्रेइंग करुन रस्ते धुणे, रस्त्याच्या कडेला पडलेला बांधकाम राडारोडा यांचे निर्मूलन करणे, पदपथांचीही स्वच्छता करणे अशा विविध प्रकारे सखोल स्वच्छता करण्यात येत आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मैदाने तसेच मोकळ्या जागा यांच्या स्वच्छतेची विशेष मोहीम सर्व विभाग कार्यालयांच्या स्तरावर राबविण्यात आली. यामध्ये खालील मैदानांची साफसफाई करण्यात आली. भास्कर घाडी मैदान सेक्टर ५ ऐरोली, कोपरी गावदेवी मैदान तुर्भे, गावदेवी मैदान सेक्टर ५ सानपाडा, कोपरखैरणे सेक्टर ६ ओपन प्लॉट, सेक्टर ५ ते ८ मैदान कोपरखैरणे, रेल्वे स्टेशन कोपरखैरणे पार्किंग, इ. परिसराची सखोल स्वच्छता करण्यात आली आहे.

# डिझेलचोरी करणाऱ्या रॅकेटचा भांडाफोड

## चौघांवर गुन्हा दाखल

**नवी मुंबई : बातमीदार**

आरएमसी प्लांटवर वापरल्या जाणाऱ्या अवजड वाहनांमधून डिझेल चोरी करून विकणाऱ्या रॅकेटचा भंडाफोड झाला आहे. तुर्भे एमआयडीसीत कॉरीच्या जागेत रात्रीच्या वेळी हा प्रकार चालायचा. त्याची माहिती मिळताच शिधावाटप विभागाने छापा टाकून कारवाई करून चौघांवर गुन्हा दाखल केला आहे.

तुर्भे एमआयडीसीमधील एका कॉरीत डिझेल तस्करी चालत असल्याची माहिती वाशीच्या शिधावाटप विभागाला मिळाली होती. त्यावरून भरारी पथकाने मंगळवारी रात्री त्याठिकाणी छापा टाकला असता तिथे एका अवजड वाहनातून डिझेल काढून ते ड्रममध्ये भरले जात असल्याचे आढळून आले. ते वाहन अमन आरएमसी प्लांटमध्ये वापरातले होते.

कामानिमित्त वाहनात भरलेले डिझेल चालकामार्फत तस्कर टोळीला १४०० रुपये प्रति कॅन दराने विकले जात होते. त्यासाठी कॉरीत शेडमध्ये मोठमोठे ड्रम ठेवले होते.

शिधावाटप अधिकारी छाया पालवे यांनी याबाबत तुर्भे पोलिसांकडे तक्रार केली होती. त्यावरून शैलेशकुमार प्रसाद, राजकपूर प्रसाद, सरफराज अजर व महेशकुमार यांच्यावर गुन्हा दाखल केला असून कारावाईत मिळालेले २५ लाखांचा रेडीमिक्स बल्गर व सात हजारांचे डिझेल जप्त केले आहे.

# वायू प्रदूषण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विकसकांवर कारवाई



**नवी मुंबई : बातमीदार**

वायू प्रदूषण प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबताना महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार सर्वच विभाग कार्यालय क्षेत्रातील बांधकाम साईट्सवर मानक कार्यप्रणालीनुसार कार्यवाही होत असल्याबद्दल काटेकोर पाहणी करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने तुर्भे विभागातील ७ बांधकाम साईट्सवरील काम बंद करण्यात आले आहे.

अशाच प्रकारे घणसोली विभाग कार्यक्षेत्रामध्ये सुरू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी वायू व ध्वनी प्रदूषणाबाबतच्या मानक कार्यप्रणालीतील नियमांची अंमलबजावणी न केल्यामुळे आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली. सेक्टर ३ घणसोली येथील भूखंड क्र. २४ व २५ या ठिकाणची गामी अँड कृष्णा इंटरप्राईजेस ही मालमत्ता सील केलेली आहे तसेच भूखंड क्र. २६, सेक्टर ३ येथील लाल केबी इन्फ्रा प्रा.लिमी. या विकासकाचे बांधकाम बंद करण्यात आलेले आहे.

घणसोली विभागाचे सहाय्यक आयुक्त वसंत मुंडावरे यांच्या नियंत्रणाखाली, कार्यकारी अभियंता यशवंत कापसे, उप अभियंता रमेश गुरव, उप अभियंता किरण पाटील तसेच कनिष्ठ अभियंता, स्वच्छता अधिकारी, उद्यान सहाय्यक यांनी ही कारवाई केली.

# गव्हाण विद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस यांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आझाद हिंद सेनेच्या माध्यमातून ब्रिटिशांना हद्दपार करून देशाला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेले प्रखर राष्ट्रभक्त नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विनम्र अभिवादन करण्यात आले.



सशस्त्र क्रांतिकारी चळवळीचा इतिहासातील सुवर्ण पान म्हणजे भारताबाहेर जावून स्वतःच्या देशासाठी क्रांतिकारक लढा देणे, भारतीयांना तुम मुझे खून दो, मै तुम्हे आझादी दूंगा !! असे राष्ट्रप्रेमी आवाहन करून प्रोत्साहित करण्याचे अतिशय प्रेरक कार्य करणाऱ्या नेताजींबद्दल विद्यार्थी भरभरून बोलले.यामध्ये आरोही बापू नाळे, सिमरन संजय डाकवे,काव्या उदय पाटील, अनुष्का दिपक ठाकरे,विनम्र अमित अडसुळे, सार्थक शांताराम काटे, आलिया खान ह्या विद्यार्थ्यांच्या भाषणांचा समावेश होता.

उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनातील महत्त्वाचे प्रसंग आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांसमोर सादर केले. प्राचार्या जोत्स्ना ठाकूर यांचे हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या वेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, संस्थेचे लाईफ मेंबर तथा जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर यांचेसह रंजिता मुंबईकर, इयत्ता सहावी ब च्या वर्गशिक्षिका शितल ठाकूर, सुजाता चौधरी, मोनाली बाबर, दर्शना म्हात्रे, दर्शना भोईर, सोनाली घरत, ज्योत्स्ना कोळी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# उरणमध्ये अनोळखी मयत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध

**उरण : बातमीदार**

उरण पोलीस ठाण्याच्या क्षेत्रात पंजाब ब्रीजचे बाजुला, पनवेल– जे.एन.पी.टी पश्चिम वाहीनी मार्गिकेवर, ११ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजता एक अनोळखी व्यक्ती मृत अवस्थेत आढळून आली होती. या व्यक्तीचे अद्यापपर्यंत कोणीही वारसदार सापडले नाहीत. त्यामुळे पोलीस या मृत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत.

मृत व्यक्तीचे वर्णन साधारण ३० ते ३५ वर्ष, निळ्या रंगाचा हाफ बाह्याचा टिशर्ट, गडद निळ्या रंगाची फुल ट्रैक पॅन्ट, चेहऱ्यावरील त्वचा निघालेली असे आहे. पोलीस उपनिरीक्षक संजय साबळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी पोलीस तात्पुरते कार्यवाही केली असून उरण पोलीस ठाण्यात अ.मृ. रजि. नं. ८८/२०२५ भा.ना.सु. संहीता कलम १९४ प्रमाणे वरील घटना दाखल करण्यात आलेली आहे

अनोळखी मृतदेहाची ओळख पटविण्यासाठी पोलीसांनी आवाहन केले आहे. कोणालाही सदर व्यक्तीची माहिती असल्यास उरण पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक संजय साबळे (९४२२९४०२२५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# चिंचवलीतून मायलेक बेपत्ता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील चिंचवली गोविंदनगर येथील एक २७ वर्षीय महिला गुरुवारी (दि.२९) आपल्या तीन वर्षांच्या मुलाला घेऊन कोणास काही एक न सांगता घरातून निघून गेली ती अद्याप परत आलेली नाही. त्यामुळे पनवेल तालुका पोलीस ठाण्यात ती बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे.



शुभांगी सचिन पैठणे असे बेपत्ता महिलेचे नाव असून तिची उंची पाच फूट, नाक नकटे, केस लांब, डोळे काळे, बांधा मध्यम आहे. तिने अंगान कुडता व पायजमा घातलेला आहे. तर तिचा मुलगा कार्तिक तीन वर्षांचा असून त्याची उंची तीन फुट, नाक नेटके, केस बारीक, डोळे काळे, बांधा मध्यम आहे. त्याने अंगात भगवा टी शर्ट व काळी हाफ पॅन्ट घातली आहे. ही महिला व मुलगा कोणास दिसल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भाजप नेते केदार भगत यांचा वाढदिवसानिमित्त अन्नदान





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे पनवेल शहर उपाध्यक्ष केदार भगत यांचा वाढदिवस यंदाही सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्यात आला. नेरे येथील स्नेहकुंज वृद्धाश्रमात अन्नदान करून त्यांनी आपला वाढदिवस साजरा केला. दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे कोणताही गाजावाजा व बॅनरबाजी न करता अत्यंत साधेपणाने हा कार्यक्रम पार पडला.

केदार भगत यांच्या वतीने दरवर्षी वाढदिवसानिमित्त अन्नदान आणि विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. यंदाही त्यांनी भपकेबाजी टाळून स्नेहकुंज वृद्धाश्रमातील आजी–आजोबांना भोजन दिले. यावेळी वृद्धाश्रमातील ज्येष्ठांनी केदार भगत यांना उदंड आयुष्यासाठी आशीर्वाद देत मनापासून आभार मानले.


वाढदिवसानिमित्त केदार भगत यांनी लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. सामाजिक कार्याची ही परंपरा अशीच पुढे चालू ठेवण्याचा मानस त्यांनी या वेळी व्यक्त केला.

या अन्नदान उपक्रमावेळी नितीन जोशी (संचालक, स्नेहकुंज वृद्धाश्रम), सुमित दसवते, निलेश पाटील, रवी पारचे, शेषनाथ गायकर, ब्रिजेश बहिरा, यज्ञेश पाटील, चेतन म्हसकर, संतोष वर्तले, हर्षद गडगे, यज्ञेश पाटील आणि इतर सर्व मित्रमंडळ व कार्यकर्ते उपस्थित होते. अजित पवार यांच्या निधनामुळे वाढदिवसाचा कोणताही उत्सव साजरा न करता केवळ सेवाकार्याला प्राधान्य देण्यात आले.



**खारघर : येथील पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षकपदी संजय जोशी यांची नियुक्ती झाल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील यांनी अभिनंदन केले.**

क्लिक...क्लिक...!



**श्रीवर्धन : सायंकाळी क्षितिजावर सोनेरी किरणांची होणारी रंगांची उधळण मनाला मोहून टाकते. निसर्गरम्य श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यावरील हे मनोहरी दृश्य पर्यटकांना आकर्षित करते.** (छाया : अमेय नाझरे)

# 'वॉरिअर्स क्लब'कडून मर्दानी खेळांचे प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड,नवी मुंबई येथील वॉरियर्स क्लब या लाठी – काठी,राज्यशस्त्र दांडपट्टा,तलवारबाजी,भाला चालविणे आदी शिवकालीन पारंपरिक मर्दानी खेळांचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेच्या प्रशिक्षणार्थींनी ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त सांताक्रूझ,मुंबई येथील नवीन पोलीस वसाहतीत संपन्न झालेल्या समारंभात या खेळांचे अत्यंत प्रेक्षणीय प्रदर्शन करीत रसिकांची मने जिंकली.



प्रसिद्ध बॉलिवूड सिने दिग्दर्शक रोहित शेट्टी यांचेसह सहाय्यक पोलीस आयुक्त मारूती पंडीत,महेंद्र तुर्किया,म्हाडाचे सी.ई.ओ.राठोड साहेब,पोलीस निरिक्षक शिंदे साहेब,सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय धोत्रे व सहाय्यक पोलीस निरिक्षक सज्जन लांडगे आदींच्या प्रमुख उपस्थित संपन्न झालेल्या या समारंभात वॉरिअर्स क्लबचे मुख्य प्रशिक्षक आणि राष्ट्रीय रेफरी ओमकार सागर रंधवे व ऋतुजा सागर रंधवे व त्यांच्या प्रशिक्षणार्थींनी या सर्व खेळांचे अत्यंत शिस्तबद्ध,साहसी व रोमहर्षक प्रदर्शन केले.

या प्रात्यक्षिकांमध्ये वॉरियर्स क्लब च्या संचालक प्रशिक्षकांसह साडेपाच वर्ष ते साठ वर्षापर्यंतच्या प्रशिक्षणार्थींनी उत्साहवर्धक सहभाग नोंदविला. सांताक्रुझ मधील नवीन पोलीस वसाहतीत संपन्न झालेल्या या समारंभाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय धोत्रे व सहाय्यक पोलीस निरिक्षक सज्जन लांडगे यांनी नेटके नियोजन केले. प्रसिद्ध चित्रपट कला दिग्दर्शक युवराज लांडगे यांनीही वॉरियर्स क्लबच्या खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. या वेळी अनेक वरिष्ठ पोलीस अधिकारी व त्यांचे कुटुंबीय आणि रसिक प्रेक्षक उपस्थित होते.

वॉरियर्स क्लबच्या वतीने हा दिमाखदार कार्यक्रम मुंबईमध्ये सादर करण्यासाठी आमंत्रित केल्याबद्दल मुंबई पोलीस अधिकाऱ्यांचे,संयोजकांचे ऋण निर्देश व्यक्त करून वॉरियर्स क्लबचे अध्यक्ष सागरकुमार रंधवे यांनी सर्व प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षकांचे अभिनंदन केले.

# श्रीवर्धन आगारात इंधन पंप बंद

**श्रीवर्धन : भारत चोगले**

विविध प्रशासकीय कारणांमुळे कायमच चर्चेत असलेले श्रीवर्धन एसटी आगार पुन्हा एकदा गंभीर कारणामुळे वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. आगारातील इंधन पंप बंद असल्याने श्रीवर्धनहून मुंबई व पुणे विभागात धावणाऱ्या बसेसना माणगाव आगारात जाऊन इंधन भरावे लागत आहे, परिणामी प्रवासीवर्गाला मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.



## प्रवासीवर्गाची गैरसोय

श्रीवर्धन स्थानकातून पहाटे चार वाजल्यापासून रात्री साडेनऊ वाजेपर्यंत म्हसळा, बोर्लीपंचतन मार्गे मुंबई विभागात तसेच काही बसेस पुणे विभागात नियमितपणे धावतात. याशिवाय श्रीवर्धन–माणगाव मार्गावरही वारंवार फेऱ्या सुरू असतात. नियमानुसार या सर्व बसेसना मार्गस्थ होण्यापूर्वी श्रीवर्धन आगारातच इंधन भरले जाणे अपेक्षित आहे, मात्र सध्या आगारातील इंधन पंप बंद असल्याने ही जबाबदारी माणगाव आगारावर ढकलण्यात आली आहे.

प्रवासी वर्गाला नाहक त्रास लांब पल्ल्याच्या बसेसना माणगाव आगारात इंधनासाठी थांबावे लागत असल्याने प्रत्येक फेरीला किमान ३० मिनिटांचा विलंब होत आहे. त्यातच पंपावर आधीच एखादी बस उभी असल्यास हा वेळ आणखी वाढतो. परिणामी वेळेत पोहोचण्याच्या अपेक्षेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा रोष बसचालक व वाहकांवर उतरतो–जे प्रत्यक्षात या परिस्थितीस जबाबदार नाहीत.

प्रवासाचा कालावधी वाढला. श्रीवर्धन–मुंबई मार्गावरील बसेसना नागोठणे ते खारपाडा दरम्यान अनेक थांबे दिले असल्याने आधीच त्रस्त झालेल्या प्रवासी वर्गाला आता इंधनासाठी होणारा अतिरिक्त विलंब सहन करावा लागत आहे. नियमानुसार श्रीवर्धन ते मुंबई प्रवासाचा कालावधी ५ तास ५० मिनिटांचा असताना, सध्याच्या परिस्थितीत हा प्रवास ७ तासांपर्यंत वाढला आहे. त्यामुळे श्रीवर्धन आगाराच्या बसेस प्रवाशांसाठी 'डोकेदुखी' ठरत असल्याची तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (MSRTC) ही सार्वजनिक सेवा देणारी संस्था असून, प्रवाशांना वेळेत, सुरक्षित व सुविधायुक्त सेवा देणे ही तिची कायदेशीर जबाबदारी आहे. आगारातील इंधन पंप बंद ठेवून नियमित फेऱ्या चालवणे, तसेच त्याचा भार इतर आगारांवर टाकणे, हे प्रशासनिक दुर्लक्ष व नियोजनाचा अभाव दर्शवते. यामुळे प्रवाशांच्या वेळेचा अपव्यय होतोच, शिवाय सार्वजनिक सेवेच्या दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण होते. जबाबदारी कोणाची?

इंधन बचत अभियानाच्या नावाखाली जर आगारातील मूलभूत सुविधा ठप्प होत असतील, तर त्याची तातडीने उच्चस्तरीय चौकशी होणे गरजेचे आहे. प्रवासी वर्गाला होणारा त्रास, वाढलेला प्रवासकालावधी आणि कर्मचाऱ्यांवर येणारा मानसिक ताण लक्षात घेता, श्रीवर्धन आगारातील इंधन पंप तत्काळ सुरू करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा, प्रवासी संघटना व नागरिकांकडून कायद्याच्या मार्गाने दखल घेण्याची मागणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# सुधागड तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी नवी संधी

## महाविस्तार एआय ॲपद्वारे स्मार्ट शेतीचा मार्ग

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

राज्य शासनाच्या कृषी विभागाने नुकतेच 'महाविस्तार एआय ॲप' विकसित केले आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्याला डिजिटल सेवेच्या माध्यमातून शास्त्रशुद्ध आणि रिअल–टाइम कृषिविषयक सल्ला देऊन त्यांचे सक्षमीकरण करणे हा या ॲपचा उद्देश आहे.

या ॲपवर हवामान, माती, कृषी सल्ला, खाद–बियाणे, किड–रोग नियोजन, बाजारभाव, बाजारपेठ तसेच विविध शासकीय योजनांची माहिती एकत्रितपणे उपलब्ध आहे. मराठी आणि इंग्रजी भाषेतील चॅटबॉटच्या माध्यमातून शेतकऱ्यांना स्थानिक व त्यांच्या गरजेनुसार सल्ला सहज मिळू शकतो. क्लिष्ट माहिती आणि शेतीतील व्यवहार्य निर्णय यातील दरी दूर करण्याचे काम महाविस्तार करते. शाश्वत शेती, डिजिटल सक्षमीकरण आणि समृद्ध गावे या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.


या ॲपचा वापर करून उत्पादन खर्चात कपात होऊन उत्पन्नात वाढ कशी साधता येईल यासंदर्भात शास्त्रशुद्ध माहिती देण्यात आली. तालुका कृषी अधिकारी श्रीमती दयावंती कदम यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले की, जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी महाविस्तार एआय ॲप इंस्टॉल करून आपल्या शेतीमध्ये त्याचा वापर करावा. पमधील विविध मेनूंचा प्रत्यक्ष वापर करून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीतून अधिक लाभ मिळवता येईल, असे त्यांनी सांगितले.

# 'जेनझी थॉट्स'मध्ये १५००हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग

## अभाविपतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात आयोजन

**पाली : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या (अभाविप) वतीने आयोजित 'जेनझी थॉट्स' आणि 'थॉट वॉल' या १० दिवसीय वैचारिक उपक्रमाचा नुकताच दिमाखात समारोप झाला. १४ ते २३ जानेवारी दरम्यान चाललेल्या या मोहिमेला विद्यार्थ्यांनी उदंड प्रतिसाद दिला असून, सुमारे १५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी यात आपली मते नोंदवली.



या उपक्रमांतर्गत केवळ चर्चाच नाही, तर राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत विद्यार्थ्यांचा सहभाग कसा असावा, यावर भर देण्यात आला. यात प्रामुख्याने खालील विषयांवर विशेष सत्रे पार पडली. उद्योजकता विकास आणि स्वावलंबी भारत तसेच तरुणांनी नोकरी शोधणारे न बनता नोकरी देणारे बनावे, यावर मार्गदर्शन करण्यात आले. महिला सक्षमीकरण आणि विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसोबतच त्यांच्या नेतृत्वावर भाष्य करण्यात आले. महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या खुल्या निवडणुका आणि विकसित भारताचे स्वप्न यावर विद्यार्थ्यांनी सखोल मते मांडली.

या उपक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे 'Talking While Walking' (चालता–बोलता) ही संकल्पना. याद्वारे विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून त्यांचे विचार लघू व्हिडिओ आणि रील्सच्या माध्यमातून टिपण्यात आले. या आधुनिक पद्धतीमुळे विद्यार्थ्यांना मुक्तपणे व्यक्त होता आले. तसेच, 'Thought Wall' (विचार भिंत) आणि पॉडकास्टच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी नेतृत्व व सामाजिक जबाबदारी या विषयांवर आपले मतप्रदर्शन केले.

# रायगडला 'सर्वोत्तम मिरवणूक' मानाचा पुरस्कार

**पाली : प्रतिनिधी**

राजभवन आयोजित 'चॅलेंजर्स ब्रिगेड: आव्हान २०२५–२६' या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ आपत्ती पूर्व तयारी प्रशिक्षण शिबिरात रायगड जिल्ह्याच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) संघाने आपल्या अष्टपैलू कामगिरीने यशाचे शिखर गाठले आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे पार पडलेल्या या शिबिरात ३६ जिल्ह्यांच्या स्पर्धेत रायगडने 'सर्वोत्तम मिरवणूक' हा मानाचा पुरस्कार पटकावला.



मुंबई विद्यापीठाचे विशेष कार्यकारी अधिकारी प्रा. सुशिल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा समन्वयक प्रा. तुळशिदास मोकल यांच्या नियोजनाने हा संघ सज्ज झाला होता. शेठ जे.एन. पालीवाला महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अनिल झेंडे यांनी संघाचे नेतृत्व केले. या यशात सी.के.टी. महाविद्यालय (पनवेल) आणि पाली–सुधागड महाविद्यालयाचे मोलाचे सहकार्य लाभले.

## कोकणच्या संस्कृतीचे दर्शन

या शिबिरात महाराष्ट्रातील २४ विद्यापीठांमधील १०४८ स्वयंसेवक आणि ८७ संघनायक सहभागी झाले होते. नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींना समर्थपणे तोंड देण्यासाठी राष्ट्रीय आपदा निवारण बलाच्या (NDRF) जवानांनी स्वयंसेवकांना सलग आठ दिवस खडतर प्रशिक्षण दिले. यात बचावकार्य, प्राथमिक उपचार, शिस्त, नेतृत्व गुण आणि आपत्कालीन व्यवस्थापनाचे बारकावे शिकवण्यात आले.

या प्रभावी सादरीकरणाची दखल घेत कुलगुरू डॉ. शरद रामराव गडाख यांच्या हस्ते रायगड जिल्ह्याला गौरविण्यात आले. कामगिरीबद्दल मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. रविंद्र कुलकर्णी, प्र–कुलगुरू डॉ. अजय भामरे आणि कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे यांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले.

शिबिरातील सांस्कृतिक मिरवणुकीत रायगडच्या संघाने कोकणच्या संस्कृतीचे दर्शन घडवले. बाल्या नृत्याने मुलांच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

## खाद्यतेल कारखान्यातून १७ लाखांचा माल लंपास

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीतील खाद्यतेल निर्मितीत आघाडीवर असणारा फ्रिगोरीफिको अलाना प्रा.लि. कारखान्यातील १६ लाख ९४ हजार ५३६ रुपये किंमतीचे खाद्यतेलाचा माल ट्रकचालकाने ट्रकला बनावट नंबर प्लेट लावून लंपास केल्याची घटना घडली आहे.

खोपोली पोलीस ठाणे हद्दीत २७ ते ३० जानेवारीदरम्यान अनोळखी आरोपी ट्रक चालक इसमाने स्पेक्ट्रा लॉजीस्टीक सोल्युशन ट्रान्सपोर्ट कंपनीचे मोबाईल नबंरवरुन संपर्क साधून फ्रिगोरीफिको अलाना प्रा.लि. कंपनी यांचा विश्वास संपादन केला. खाद्यतेलाचा माल त्याचेकडील बनावट नबंर प्लेट असलेल्या ट्रकमध्ये भरुन खाद्यतेलाचा मालाचा परस्पर अपहार केला.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुजित गडदे हे करीत आहेत.

# कार्मेल कॉन्व्हेंट स्कूलच्या विद्यार्थ्यांचे भव्य बँड संचलन

**खोपोली, चौक : प्रतिनिधी**

कार्मेल कॉन्व्हेंट स्कूल, खोपोली येथील स्काऊट–गाईड विद्यार्थ्यांनी ७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त रायगड जिल्हा शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमात उत्कृष्ट बँड संचलन व बँड प्रदर्शन सादर करून उपस्थित मान्यवरांचे व प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले.



अलिबाग येथील जिल्हा पोलीस परेड ग्राउंडवर पार पडलेल्या रायगड जिल्हा शासकीय ध्वजारोहण सोहळ्यास पालकमंत्री भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, उपजिल्हाधिकारी सुरेंद्र शिर्के व रवींद्र शेळके, जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी स्नेहा भोसले यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

२३ ते २९ नोव्हेंबर २०२५ दरम्यान लखनऊ (उत्तर प्रदेश) येथे झालेल्या १९ व्या राष्ट्रीय जांबोरीमध्ये कार्मेल कॉन्व्हेंट स्कूलच्या स्काऊट–गाईड बँड पथकाने महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना बँड संचलनाद्वारे मानवंदना दिली होती. तसेच राष्ट्रीय बँड स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करत 'अ श्रेणी' प्राप्त केल्याबद्दल या बँड पथकास रायगड जिल्हा मुख्य संचलन कार्यक्रमात राष्ट्रध्वज व मान्यवरांना मानवंदना देण्यासाठी आणि बँड प्रदर्शन सादर करण्यासाठी विशेष निमंत्रित करण्यात आले होते.

या वेळी राष्ट्रीय जांबोरीतील उल्लेखनीय यशाबद्दल स्काऊट – गाईड विद्यार्थी, शिक्षक व शाळेचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

राष्ट्रीय जांबोरीमध्ये रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या शाळेच्या एकूण २५ स्काऊट–गाईड विद्यार्थी व तीन शिक्षकांनी सक्रिय सहभाग घेतला होता. या यशामागे रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभाग, रायगड भारत स्काऊट–गाईड जिल्हा संस्था, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) महारुद्र नाळे, शिक्षणाधिकारी ललिता दहितुळे, उपशिक्षणाधिकारी तथा जिल्हा आयुक्त स्काऊट मा.सुनील भोपळे, उपशिक्षणाधिकारी तथा जिल्हा सेक्रेटरी स्काऊट–गाईड मा. संतोष शेडगे, जिल्हा संघटक गाईड सोनाली, शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर निर्मल मारिया, व्यवस्थापक सिस्टर ज्युली मारिया, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त गायकवाड व डफळ, जिल्हा कार्यालयीन पूनम व दाते, बँड मास्टर राजेश यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

या संचलनात सहभागी स्काऊट व गाईड विद्यार्थ्यांसह रायगड जिल्हा संघ प्रमुख तथा स्काऊट मास्टर संदीप साळुंखे, स्काऊट मास्टर समीर शिंदे व गाईड कॅप्टन सरिता बडकूल यांनी विशेष योगदान दिले.

# श्री क्षेत्र पहुर येथे अखंड हरिनाम सप्ताह

**धाटाव : प्रतिनिधी**

सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री क्षेत्र पहुर (ता. रोहा, जि. रायगड) येथे अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहात झाला.

परमपूज्य स्वानंद सुखनिवासी गुरुवर्य अलिबागकर महाराज कोल्हटकर, गुरुवर्य स्वानंद सुखनिवासी धोंडू महाराज कोल्हटकर, हरिभक्त परायण गोपाल महाराज वाजे तसेच ह.भ.प. यादव महाराज पाली यांच्या मार्गदर्शनाखाली हा धार्मिक सोहळा २५ ते २६ जानेवारी २०२६ या कालावधीत पार पडला. या सप्ताहात श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या पारायणाचे नेतृत्व ह.भ.प. संतोष महाराज पवार व ह.भ.प. चंद्रकांत महाराज शिंदे यांनी केले.



पहिल्या दिवशी सायंकाळी गुरुवर्य मारुती महाराज कोल्हटकर यांच्या अमृतमयी कीर्तनाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले होते. दुसऱ्या दिवशी ह.भ.प. यादव महाराज पाली यांच्या काल्याच्या कीर्तनाने हरिभक्तांचा उत्साह अधिकच द्विगुणित झाला.

या निमित्ताने पार पडलेल्या पालखी सोहळ्यामुळे संपूर्ण पहुर नगरीत वैष्णवांचा मेळा अवतरल्याचे चित्र पाहायला मिळाले. हरिनामाच्या गजरात, टाळ–मृदंगाच्या निनादात परिसर भक्तिमय झाला होता.

या धार्मिक कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पहुर ग्रामस्थ मंडळी (मधळी आळी) यांचे विशेष सहकार्य लाभले. अध्यक्ष ह.भ.प. शंकर खांडेकर, सचिव बळीराम पवार, चंद्रकांत शिंदे, अभिमन्यू पवार तसेच पहुरच्या सरपंच सौ. दिपाली दिलीप खांडेकर, सुनील शिंदे यांनी पुढाकार घेतला. तसेच 'द ग्रेट मराठा मित्र मंडळ, मधळी आळी पहुर मुंबई'चे अध्यक्ष ह.भ.प. श्रीराम शिंदे, सचिव तुळशीराम शिंदे यांच्यासह विनायक शिंदे, संदीप शिंदे, विलास खांडेकर, दिलीप खांडेकर, सुरेश पवार, प्रकाश खांडेकर यांचेही मोलाचे योगदान लाभले.

याशिवाय ह.भ.प. दयाराम मोरे, मुंबईकर मंडळाचे कार्यकर्ते, महिला मंडळ तसेच समस्त पहुर ग्रामस्थांनी विशेष सहकार्य केल्याची माहिती श्री प्रवीण पवार यांनी दिली. या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नामुळे अखंड हरिनाम सप्ताह भक्तीभावात व मोठ्या उत्साहात यशस्वीरीत्या पार पडला.

# श्री दिव्यांग सामाजिक संस्थेतर्फे हळदीकुंकू समारंभ

**माणगाव : प्रतिनिधी**

'एक हात मदतीचा आणि माणुसकीचा' हा वारसा जपत, श्री दिव्यांग सामाजिक संस्थेच्या वतीने मोठ्या उत्साहात 'हळदीकुंकू' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून दिव्यांग भगिनींचा सन्मान केला.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणून चारिझेन फाउंडेशनचे अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा,पूजा रंधावा आणि उमेश यादव उपस्थित होते. तसेच प्रशासकीय आणि पोलीस दलातील मान्यवर म्हणून पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. या वेळी अंकिता मोरे, खडतर, कल्याणी पाटील, किशोर झेमसे, अंजली आणि पूजा वाघमोडे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

केवळ धार्मिक विधी म्हणून नव्हे, तर दिव्यांग महिलांना मुख्य प्रवाहात आणणे आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. बोऱ्हाडे यांनी आपल्या भाषणात दिव्यांगांच्या हक्क आणि सुरक्षेबाबत मोलाचे मार्गदर्शन केले, तर कॅप्टन रंधावा यांनी दिव्यांग व्यक्तींच्या जिद्दीला सलाम केला.



# आत्मचरित्र लेखन स्पर्धेत सुभाष राठोड राज्यात अव्वल

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शालेय शिक्षण विभागतर्फे राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद पुणे महाराष्ट्र कडून आयोजित आत्मचरित्र लेखन स्पर्धेत राज्यातील ३६ जिल्ह्यातून आठ विभागातील ४० लोकांची प्रति विभागातून पाच लोकांची निवड होऊन ४० लोकांची निवड राज्यस्तरीय स्पर्धेसाठी करण्यात आली होती. या स्पर्धेत मुंबई विभागाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पाच जणांची निवड करण्यात अली. यात रसायनी पाताळगंगा येथील सुभाष राठोड हे एक शिक्षक होते.



या स्पर्धेत सहभागी ४० शिक्षकांचे उत्तम आणि उत्तम आत्मचरित्र लेखन या ठिकाणी सादर करण्यात आले. ४० स्पर्धकात राज्यातून सर्वात अव्वल ठरले ते रायगड जिल्हा परिषद ग्रामीण उत्कृष्ट शाळेचे सुभाष राठोड. रायगड जिल्ह्याचा नावलौकिक त्यांनी राज्यभर पसरवण्याच्या या आधी शाळेच्या माध्यमातून केला. वैयक्तिक स्पर्धेतसुद्धा त्यांनी आपले व शाळेचे तसेच जिल्ह्याचे नाव राज्यवर गाजवले आहे.

## तळा तालुक्यात रानमाळावर पळस बहरला

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुका हा वनसंपदेने नटलेला तालुका आहे. तेथे प्रत्येक ऋतूमध्ये वेगवेगळ्या प्रकारची फळ व फुले येतात. आता तर पळसाची झाडे ही नारंगी फुलांनी बहरलेली दिसत आहेत.



रानमाळावर हे पळसाचे झाड नारिंगी फुलांनी बहरलेले बघुन वृक्षप्रेमी त्या झाडाकडे आकर्षित होतात व आपल्या कॅमेर्यात नारंगी फुलांची जणू उधळण केलेल्या झाडाचे फोटो काढतात. पळस हि एक आयुर्वेदिक औषधी वनस्पती आहे.

या झाडाच्या पानांचा आकार हा तळहाता एवढा रुंद व जाड असतो. त्यांचा वापर पत्रावळी करण्यासाठी करतात. पूर्वी मोठमोठ्या कार्यक्रमात या पानांपासून बनविलेल्या पत्रावळीचा वापर होत होता, परंतू आता यूज अॅण्ड थ्रोचा फॅड असल्यामुळे ह्या पानांपासून बनविलेल्या पत्रावळी नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत, परंतु तळा तालुक्यातील काही गावात आजही या पानांच्या पत्रावळी बनवितातात.

# ऑस्ट्रेलियन ओपनची रायबाकिना नवी जेती

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

मेलबर्न येथे खेळल्या गेलेल्या ऑस्ट्रेलियन ओपन २०२६ महिला एकेरीचे जेतेपद एलेना रायबाकिना हिने पटकावले. अंतिम फेरीत कझाकस्तानच्या एलेना रायबाकिनाने जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या अरायना सबालेन्काचा पराभव करून तिचे पहिले ऑस्ट्रेलियन ओपन विजेतेपद जिंकले.



ऑस्ट्रेलियन ओपन २०२६चा अंतिम सामना रॉड लेव्हर अरेना येथे खेळला गेला, जिथे दोन्ही खेळाडूंनी प्रभावी कामगिरी केली, परंतु शेवटी रायबाकिनाच्या प्रभावी पुनरागमनामुळे तिने विजयाला गवसणी घातली. सबालेन्का या सामन्यात वर्चस्व गाजवेल अशी चाहत्यांना अपेक्षा होती, पण त्याउलट रायबाकिनाविरूद्ध खेळताना ती पूर्णपणे दबावाखाली दिसली आणि अंतिम सामना २-१च्या फरकाने गमावला.

एलेना रायबाकिना ही ऑस्ट्रेलियन ओपन जिंकणारी कझाकस्तानची पहिली खेळाडू आहे. तिच्या कारकिर्दीतील हे तिचे दुसरे ग्रँड स्लॅम विजेतेपद आहे. यापूर्वी तिने २०२२मध्ये विम्बल्डन जिंकले होते.

ऑस्ट्रेलियन ओपन २०२६ च्या महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात एलेना रायबाकिनाने पहिला सेट ६-४च्या फरकाने जिंकण्यात यश मिळवले. दुसऱ्या सेटमध्ये सबालेन्काने शानदार पुनरागमन केले आणि रायबाकिनाला कडवी झुंज दिली आणि तो सेट ६-४ असा जिंकून सामना १-१ असा बरोबरीत आणला. सर्वांचे लक्ष आता तिसऱ्या सेटवर होते, जिथे सबालेन्का आपला वेग कायम ठेवण्यात अपयशी ठरली आणि तिला ६-४ असा पराभव पत्करावा लागला, तर एलेना रायबाकिनाने सामना २-१ने असा जिंकला.

एलेना रायबाकिनाचा याआधी २०२३च्या ऑस्ट्रेलियन ओपनच्या एकेरीच्या अंतिम फेरीत सबालेन्काने पराभव केला होता. रायबाकिनाने आता सबाल ेन्काला पराभूत करत बदला घेतला. २००८मध्ये ऑस्ट्रेलियन ओपन महिला एकेरीचे विजेतेपद जिंकण्याच्या मार्गावर अव्वल सहा खेळाडूंना हरवणारी रायबाकिना मारिया शारापोवानंतरची दुसरी खेळाडू ठरली.

### सबालेन्काचा पुन्हा पराभव

सबालेन्काला सलग दुसऱ्यांदा ऑस्ट्रेलियन ओपनच्या अंतिम फेरीत पराभवाचा सामना करावा लागला आहे. याआधी तिला मॅडिसन कीजकडून पराभूत व्हावे लागले होते. सबालेन्काने तिच्या कारकिर्दीत आतापर्यंत चार ग्रँडस्लॅम जेतेपदे जिंकली आहेत. तिने २०२३ आणि २०२४मध्ये ऑस्ट्रेलियन ओपन जिंकली होती, मात्र गेल्या दोन वर्षांपासून ती जेतेपदाच्या अगदी जवळ येऊन संधी गमावत आहे. ऑस्ट्रेलियन ओपन व्यतिरिक्त तिने २०२४ आणि २०२५मध्ये अमेरिकन ओपनचे जेतेपदही पटकावले आहे.

# भारताचा न्यूझीलंडवर दणदणीत विजय

## इशानच्या शतकानंतर अर्शदीपचा ‘पंजा’

**तिरुवनंतपूरम : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने पाचव्या आणि अखेरच्या टी-२० सामन्यात ४६ धावांनी दणदणीत विजय मिळवला. टी-२० विश्वचषकाच्या तयारीच्या दृष्टीने भारताने या सामन्यात प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आणि संघाने धावांचा डोंगर उभारत आपली तयारी पक्की असल्याचे सिद्ध केले. भारताकडून इशान किशनने शतकी खेळी केली आणि गोलंदाजीत अर्शदीप सिंगने पाच विकेट्स घेतल्या.



तिरूवनंतपुरमच्या ग्रीनफिल्ड क्रिकेट स्टेडियममध्ये हा सामना खेळवला गेला. भारतीय संघाने या मालिकेतील सुरुवातीचे तिन्ही सामने एकतर्फी जिंकत मालिका आपल्या नावे केली होती. चौथ्या सामन्यात न्यूझीलंडने बाजी मारली, पण अखेरच्या सामन्यात भारताने शानदार विजय मिळवत मालिका ४-१ने जिंकली.

भारताने दिलेल्या २७२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पहिल्या षटकात टीम सेफर्ट झेलबाद झाला. यानंतर फिन एलनने आपल्या उत्कृष्ट फटकेबाजीने सर्वांचे लक्ष वेधलं. एलनने ३८ चेंडूत आठ चौकार व सहा षटकारांच्या मदतीने ८० धावांची खेळी केली, तर रचिन रवींद्रने १७ चेंडूत दोन चौकार, दोन षटकारांसह ३० धावा केल्या.

अक्षर पटेलने फिन एलनला झेलबाद करत संघाला महत्त्वाचा ब्रेकथ्रू मिळवून दिला. त्यानंतर न्यूझीलंडने विकेट्स गमावायला सुरुवात केली. ग्लेन फिलिप्सला ७ धावांवर अक्षरने माघारी धाडले. यानंतर अर्शदीप सिंगने दोन वेळेस एका षटकांत २-२ विकेट्स घेतल्या आणि न्यूझीलंडचा डाव झटपट गुंडाळला. डॅरिल मिचेलने २६ धावांची खेळी केली, तर ईश सोधीने १५ चेंडूत तीन षटकार व एक चौकार लगावत ३३ धावा केल्या. भारताकडून या सामन्यात अर्शदीपने पाच विकेट्स घेतल्या. अक्षर पटेलने तीन आणि रिंकू सिंग व वरूण चक्रवर्ती यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

तत्पूर्वी भारताने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताने दोन षटकांत चांगली सुरुवात केली, पण संजू सॅमसन सहा धावा करत झेलबाद झाला. यानंतर अभिषेक शर्मा १६ चेंडूत ३० धावा करत माघारी परतला. मग इशान किशन व सूर्यकुमार यादव यांनी ५६ चेंडूत १३७ धावांची भागीदारी केली. यासह संघाने २७१ धावांचा पाया रचला. इशानने ४३ चेंडूत सहा चौकार व १० षटकारांसह १०३ धावांची खेळी केली, तर सूर्यकुमार यादवने ३० चेंडूत चार चौकार व सहा षटकारांच्या मदतीने ६३ धावा केल्या.

सूर्या इशाननंतर हार्दिक पंड्याने १७ चेंडूत एक चौकार व चार षटकारांसह ४२ धावांची खेळी केली, तर रिंकू सिंग व शिवमने महत्त्वाचे चौकार-षटकार लगावत संघाला २७१ धावांपर्यंत नेले. न्यूझीलंडकडून लॉकी फर्ग्यूसनने दोन विकेट्स, तर डफी, जेमिसन, सँटरन यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

टी-२० विश्वचषक २०२६ पूर्वी टीम इंडियाची ही अखेरची टी-२० मालिका होती. या मालिकेत संघाने सर्व प्रकारची तयारी केली असून संघ विश्वचषकासाठी तयार असल्याचे म्हणता येईल. भारताचा टी-२० विश्वचषकातील पहिला सामना ७ फेब्रुवारीला अमेरिकेविरूद्ध मुंबईत वानखेडे स्टेडियममध्ये होणार आहे.

# सूर्यकुमार यादवचा विश्वविक्रम : टी-२०मध्ये जलद तीन हजार धावा

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादव आपल्या शानदार फॉर्मात परतला आहे. सूर्याने भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पाचव्या टी-२० सामन्यातही वादळी अर्धशतकी खेळी केली. या खेळीसह कर्णधाराने वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावे केला आहे.

सूर्यकुमार यादव टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये तीन हजार धावा १९००पेक्षा कमी चेंडूत पूर्ण करणारा जगातील पहिला फलंदाज ठरला आहे. यापूर्वी हा विक्रम यूएईचा फलंदाज मोहम्मद वसीमच्या नावावर होता. वसीमने १९४७ चेंडूत तीन हजार टी-२० आंतरराष्ट्रीय धावा पूर्ण केल्या



होत्या. सूर्यकुमारने केवळ १८२२ चेंडूत हा टप्पा गाठला.

या सामन्यात सूर्यकुमारने अवघ्या ३० चेंडूत चार चौकार व सहा षटकारांच्या मदतीने ६३ धावांची झंझावाती खेळी केली. २३३.३३च्या स्ट्राइक रेटने सूर्याने या धावा केल्या. भारताची स्थित ४८ धावांत दोन बाद अशी असताना सूर्यकुमार क्रीजवर आला आणि ईशान किशनबरोबर त्याने डावाची जबाबदारी सांभाळली.

भारतीय खेळाडूंमध्ये याआधी हा विक्रम माजी कर्णधार रोहित शर्माच्या नावावर होता. रोहितने २१४९ चेंडूत तीन हजार धावा केल्या. त्यानंतर विराट कोहलीने २१६९ चेंडूत तीन हजार धावा पूर्ण करण्याचा विक्रम केला. रोहित-विराटलादेखील सूर्यकुमार यादवने मागे टाकले.

# अर्जुन तेंडुलकरच्या प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ५० विकेट्स

**मुंबई : प्रतिनिधी**

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा मुलगा आणि अष्टपैलू क्रिकेटर अर्जुन तेंडुलकर याने गोवा संघाकडून रणजी क्रिकेट स्पर्धेतील यंदाच्या हंगामात महाराष्ट्र संघाविरुद्ध ‘अर्धशतकी’ डाव साधला आहे. महाराष्ट्र विरुद्धच्या सामन्यात त्याने प्रथम श्रेणी क्रिकेटमधील ५० विकेट्सचा टप्पा पार केला.

अर्जुन तेंडुलकरने २०२२-२३ च्या रणजी हंगामातून गोवा संघाकडून पदार्पण केले होते. पदार्पणाच्या सामन्यातच त्याने राजस्थानविरुद्ध शतक झळकावले होते. याशिवाय, गोव्यासाठी त्याने फाइव्ह-विकेट हॉलचा डावही साधला आहे. यंदाच्या हंगामातील महाराष्ट्र विरुद्धच्या सामन्यात रोहन कुनूमलला याची विकेट घेत अर्जुन तेंडुलकरने प्रथम श्रेणी क्रिकेटमधील ५० विकेट्सचा टप्पा गाठला. येत्या काळात तो रणजीत आपल्या वडिलांचा विक्रमही मागे टाकू शकतो.

क्रिकेटमधील महान फलंदाज सचिन तेंडुलकर याने आपल्या कारकिर्दीत फलंदाजीशिवाय गोलंदाजीतही खास छाप सोडली आहे. रणजी सामन्यात सचिनने ८१ विकेट्स घेतलेल्या आहेत. अर्जुन या विक्रमापासून अजून खूप मागे असला तरी तो प्रमुख गोलंदाजाच्या रुपात खेळत असल्यामुळे येत्या काळात २१ विकेट्स घेत त्याच्याकडे हा विक्रम मागे टाकण्याची निश्चितच संधी असेल.

दरम्यान, अर्जुन यंदाच्या आयपीएल हंगामात लखनौ संघाकडून नवी सुरुवात करणार आहे.

# सचिन माळी यांना उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने देण्यात येणारा जिल्हास्तरीय उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार तायक्वांदो या खेळासाठी एटीएआर रायगडचे सचिव रसायनी तुराडे येथील सचिन शंकर माळी यांना प्रदान करण्यात आला.

अलिबाग येथील पोलीस परेड ग्राउंडवर प्रजासत्ताक दिनी झालेल्या समारंभात मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते हा सन २०२३-२४चा पुरस्कार माळी यांना प्रदान करण्यात आला.



या कार्यक्रमास आमदार महेंद्र दळवी, रायगडचे जिल्हाधिकारी किसन जावळे, जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

सचिन माळी हे गेली अनेक वर्षे तायक्वांदोचे प्रशिक्षण देत असून पंच म्हणूनही कार्यरत आहेत. महात्मा एज्युकेशन सोसायटीच्या रसायनीतील पिल्लई एचओसी स्कूल येथे वरिष्ठ क्रीडा शिक्षक म्हणून ते नोकरीस आहेत. त्यांनी अनेक खेळाडू घडवले आहेत.

पुरस्काराबद्दल तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष संदीप ओंबासे, सचिव गफार पठाण, खजिनदार प्रसाद कुलकर्णी, शाळेच्या मुख्याध्यापिका रीमा निकाळजे, मॅनेजमेंटचे आर.बी. पाटील, क्रीडा डायरेक्टर पद्मनाभन आदींनी माळी यांचे अभिनंदन केले.

# भारत जिंकला, पण बुमराह महागडा ठरला!

## टी-२० वर्ल्डकपपूर्वी चिंतेचा विषय



**मुंबई : रामप्रहर वृत्त**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील शेवटचा सामना तिरुवनंतपुरम येथील ग्रीनफील्ड आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळला गेला. तिथे भारताने ४६ धावांनी दणदणीत विजय मिळवत मालिका ४-१ अशी जिंकली, पण या सामन्यात भारतीय वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहची कामगिरी खूपच खराब होती. त्याने अनेक ‘नकोसे’ विक्रम आपल्या नावे केले. या सामन्यात जसप्रीत बुमराहला एकही बळी मिळवता आली नाही तसेच त्याने सर्वात महागडी गोलंदाजीही केली.

सामन्यात बुमराहने चार षटके टाकली, ५८ धावा दिल्या आणि एकही विकेट घेतली नाही. त्याच्या टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील हा त्याचा आतापर्यंतचा सर्वात महागडा आकडा आहे. त्याची याआधीची सर्वात वाईट कामगिरी म्हणजे २०२२मध्ये हैदराबादमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध विकेट न घेता ५० धावा देणे अशी होती.

एकेकाळी एकही षटकार न खाणाऱ्या बुमराहने या मालिकेत सर्वाधिक सहा षटकार खाल्ले. हादेखील नवा ‘नकोसा’ विक्रम ठरला. यापूर्वी त्याने २०२५च्या आशिया कपमध्ये पाच षटकार खाल्ले होते.

सामन्यात बुमराहने त्याच्या कारकिर्दीतील सर्वात महागडे षटकही टाकले. त्याने डावाच्या १४व्या षटकात २२ धावा दिल्या. हे षटक न्यूझीलंडचे फलंदाज डॅरिल मिशेल आणि बेव्हॉन जेकब्स यांनी चांगले खेळले. त्यांनी ४, ६, ६, १, ४, १ अशा सहा चेंडूवर धावा लुटल्या. बुमराहने एकाच टी-२० आंतरराष्ट्रीय षटकात दिलेल्या या सर्वाधिक धावा ठरल्या. त्याचे याआधीचे सर्वात महागडे षटक २०१७मध्ये इंग्लंडविरुद्ध २० धावांचे होते. त्याच मालिकेत त्याने दुसऱ्या षटकात १९ धावा दिल्या होत्या.

२०२६च्या टी-२० विश्वचषकापूर्वी भारताचा स्टार गोलंदाज असलेल्या जसप्रीत बुमराहची अशी कामगिरी टीम इंडियासाठी मोठी चिंता निर्माण करणारी आहे.

# पाकिस्तानी गोलंदाजाच्या शैलीवर खेळाडूचा आक्षेप



**लाहोर : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषकापूर्वी पाकिस्तान आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात टी-२० मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील सुरूवातीचे दोन्ही सामने जिंकत पाकिस्तानने मालिका जिंकली आहे, पण या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात मात्र पाकिस्तानच्या गोलंदाजावरून मोठा गदारोळ पहायला मिळाला. पाकिस्तानच्या गोलंदाजावर चिटिंग करण्याचा आरोप केला आहे.

टी-२० विश्वचषकासाठी निवड झालेला पाकिस्तानी फिरकी गोलंदाज उस्मान तारिक पुन्हा एकदा त्याच्या गोलंदाजी ॲक्शनमुळे वादात सापडला आहे आणि या वेळी सामन्यादरम्यान त्याच्यावर चिटिंगचा आरोप करण्यात आला आहे. पाकिस्तान आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील टी-२० मालिकेतील दुसऱ्या सामन्यादरम्यान उस्मान तारिकच्या गोलंदाजीच्या ॲक्शनवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले.

ऑस्ट्रेलियाच्या डावात कॅमेरून ग्रीन फलंदाजी करत होता आणि वेगाने धावा काढत होता. त्यानंतर ११व्या षटकात फिरकी गोलंदाज तारिक गोलंदाजी करायला आला आणि त्याने चौथ्या चेंडूवर ग्रीनला बाद केले. मोठा शॉट खेळण्याच्या प्रयत्नात ऑस्ट्रेलियन फलंदाजाने आपली विकेट गमावली. बाद झाल्यानंतर पॅव्हेलियनमध्ये परतणाऱ्या ग्रीनने सीमारेषा ओलांडताना फेकी गोलंदाजीची नक्कल करून आपला राग व्यक्त केला.

उजव्या हाताचा ऑफ-ब्रेक गोलंदाज तारिक याची गोलंदाजी ॲक्शन इतरांप्रमाणे साधारण नाहीये. तो चेंडू टाकण्यापूर्वी थांबतो आणि नंतर खांद्यावरून चेंडू न टाकता बाजूने हात आत आणून चेंडू टाकतो. हे जणू दगड फेकल्यासारखे भासते, पण तारिकची गोलंदाजीची कृती आयसीसीने दोनदा तपासली आणि क्लीनचीट दिली.

दरम्यान, उस्मान तारिकलादेखील ग्रीनने केलेली कृती दिसली आणि त्यानंतर त्याने तारिकची खिल्ली उडवली. सामन्यानंतर तारिकने इन्स्टाग्राम अकाउंटवर एक रडणाऱ्या मुलाची स्टोरी शेअर केली.

# खोपोलीत आंतरशालेय क्रीडा स्पर्धा

## मैदानी खेळामुळे शरीर व मन बलवान होते -राष्ट्रीय क्रीडापटू उदय साखरे

**खोपोली : प्रतिक्रिया**

आजच्या संगणक व मोबाईल संस्कृतीमुळे मैदानावर विद्यार्थ्यांची उपस्थिती अल्प असते. तसे होऊ नये यासाठी पालकांनी विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष द्यावे, कारण मैदानी खेळामुळे शरीर व मन बलवान होते, असे प्रतिपादन राष्ट्रीय क्रीडापटू उदय साखरे यांनी केले.



खोपोली येथील जनता विद्यालयाच्या विद्यालयाच्या पंत पाटणकर क्रीडांगणावर आंतरशालेय क्रीडा स्पर्धेचे आयोजन यशवंती हायकर्स आणि विक्रम साबळे फाउंडेशन यांच्या वतीने रविवारी (दि. १) करण्यात आले होते. त्या वेळी राष्ट्रीय क्रीडापटू साखरे उद्घाटन समारंभात बोलत होते.

व्यासपीठावर विशेष अतिथी उपनगराध्यक्ष व विक्रम साबळे फाउंडेशनचे अध्यक्ष विक्रम साबळे, बांधकाम सभापती अनिल सानप, शिवसेना पक्षाचे गटप्रमुख संदीप पाटील, शिक्षण सभापती अमित फाळे, नियोजन सभापती मयुरी रेटरेकर, महिला व बालकल्याण सभापती सुवर्णा मोरे, नगरसेवक अविनाश किरवे, विनायक तेलवणे, यशवंती हायकर्सचे अध्यक्ष मच्छिंद्र यादव, सामाजिक कार्यकर्ते बाबू पुजारी; त्याचप्रमाणे परिसरातील शाळांचे प्रतिनिधी, शिक्षक, यशवंती हायकर्सचे पदाधिकारी व विक्रम साबळे फाउंडेशनचे पदाधिकारी, क्रीडाप्रेमी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी क्रीडाज्योत प्रमुख अतिथींच्या हस्ते प्रज्वलित करण्यात आली, त्याचवेळी मैदानात श्रीफळ वाढवून तसेच क्रीडा ध्वजाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते झाले. क्रीडा शिक्षक व संस्थेचे पदाधिकारी पद्माकर गायकवाड यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला.

महेंद्र भंडारे यांनी जनता विद्यालयाच्या पटांगणासारखे नगर परिषद प्रशासनाने क्रीडांगण उपलब्ध करून द्यावे, अशी उपस्थित नगरसेवकांना विनंती केली. बांधकाम सभापती अनिल अनिल सानप यांनी आगामी आमच्या नगरसेवकांच्या सर्वसाधारण सभेत संबंधित विषय चर्चेला पटलावर असणार असल्याचा शब्द दिला. या वेळी विक्रम साबळे यांनीही विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

ज्येष्ठ निवृत्त शिक्षक सगळेगिळे यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या कार्याचा आढावा घेत क्रीडा स्पर्धेला मान्यवर व विद्यार्थी उपस्थित राहिल्याने आभार मानले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com